| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २०८ वा | गुरूवार दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अनैतिक देह व्यापार करणाऱ्यावर गुन्हा नोंद

मुरुम (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गत येणेगुर ता. उमरगा जि. धाराशिव येथील लक्ष्मण, संजय रा. जेकेकुरवाडी ता. उमरगा जि. धाराशिव, मलंग रा. येणेगुर ता. उमरगा जि. धाराशिव यांनी स्वताच्या आर्थिक फायद्यासाठी दि.२७.१०.२०२५ रोजी लक्ष्मण यांचे शेत गट नं ३६५ मध्ये येणेगुर शिवार ता. उमरगा येथे ३ महिलांना वाणिज्यिक प्रयोजना करीता आश्रय देउन त्यांना लैंगीक स्वैराचाराकरीता परावृत्त करुन त्यांच्या वरती उपजिवीका करीत असताना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तींविरुध्द पोलीस ठाणे मुरुम येथे गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगुन वाहतुकणाऱ्यावर गुन्हा दाखल

वाशी (प्रतिनिधी):पोलीस ठाणे अंतर्गत रोहीत रा.लोळदगाव ता. जि. बीड,आबा मुळे, रा. बीड इतर तीन इसम यांनी दि.१०.१०.२०२५ रोजी १६.१० वा. सु.पारगाव शिवार एनएच ५२ हायवे रोडवर महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ बाओबाजी पान मसाला च्या पुड्या, रॉयल २२० तंबाखुच्या २०० पुडे एकुण ६,६०,००० किंमतीचे व मोबाईल फोन असा एकुण पिकअप १२,६७,००० किंमतीचा विक्री करीता जवळ बाळगुन वाहतुक करत असताना महामार्ग सुरक्षा पथक मांजरसुंबा ता. जि. बीड यांना पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द कलम– १२३,२२३, २७४, २७५,३ (५) भा.न्या.सं. अन्वये परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## एसटीला दिवाळी हंगामात ३०१ कोटी रुपये उत्पन्न-परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**यंदाच्या दिवाळी हंगामात एसटीला तब्बल ३०१ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले असून सर्वाधिक उत्पन्न पुणे विभागाने मिळवले आहे. त्या खालोखाल जळगाव व नाशिक या विभागाचा क्रमांक लागतो.चांगले उत्पन्न आणल्याबद्दल परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष श्री. प्रताप सरनाईक यांनी या विभागातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.**



धाराशिव/मुंबई: –यंदाच्या दिवाळी हंगामात एसटीला तब्बल ३०१ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले असून सर्वाधिक उत्पन्न पुणे विभागाने मिळवले आहे. त्या खालोखाल जळगाव व नाशिक या विभागाचा क्रमांक लागतो.चांगले उत्पन्न आणल्याबद्दल परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष श्री. प्रताप सरनाईक यांनी या विभागातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

या वर्षी १८ आक्टोबर ते २७ आक्टोबर या दिवाळीच्या १० दिवसात एसटी महामंडळाला दररोज सरासरी ३० कोटी याप्रमाणे तब्बल ३०१ कोटी रुपये उत्पन्न मिळाले आहे. विशेष म्हणजे दिवाळी सुटीच्या परतीच्या दिवशी २७ ऑक्टोबरला ३९ कोटी ७५ लाख रुपये उत्पन्न मिळवुन या वर्षातील सर्वाधिक उत्पन्नाचा नवा विक्रम केला आहे.

एसटीच्या ३१ विभागात सर्वाधिक उत्पन्न पुणे विभागाने आणले असून (२० कोटी ४७ लाख) त्यानंतर जळगाव (१५कोटी ६० लाख) आणि नाशिक (१५ कोटी ४१ लाख ) विभागाचा क्रमांक लागतो. मागील वर्षीच्या दिवाळी हंगामाच्या पेक्षा यंदा महामंडळाने तब्बल ३७ कोटी रुपये उत्पन्न जास्त आणले आहे. सर्वसामान्य प्रवाशांची दिवाळी गोड करण्यासाठी घरापासून दूर राहून अहोरात्र कष्ट करणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांचे परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष श्री. प्रताप सरनाईक यांनी अभिनंदन केले आहे.

**उत्पन्नाचे अपेक्षित लक्ष गाठण्यास एसटीला अपयश**

यंदाच्या आर्थिक वर्षांमध्ये एप्रिल व मे हे दोन महिने वगळता गेली चार महिने एसटी महामंडळाला सातत्याने तोटा सहन करावा लागत आहे. अवकाळी पाऊस आणि पूर परिस्थिती यामुळे जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये महामंडळाला सुमारे १५० कोटी पेक्षा जास्त तोटा सहन करावा लागला.परंतु ऑक्टोबर महिन्यात दिवाळीचा हंगाम व सुट्ट्यांच्या कालावधीमुळे उत्पन्नात वाढ होईल अशी अपेक्षा होती. त्यामुळे प्रतिदिन ३४ कोटी रुपये याप्रमाणे ऑक्टोबर महिन्यात १०४९ कोटी रुपये उत्पन्न मिळविण्याचे लक्ष निर्धारित करण्यात आले होते.

तथापि,ऐन दिवाळीचे काही मोजके दिवस सोडता दैनंदिन लक्ष गाठणे महामंडळाला शक्य झाले नाही. पुणे, बीड,अहिल्यानगर अमरावती, बुलढाणा या विभागांनी मागील वर्षीच्या तुलनेत यंदाच्या दिवाळीमध्ये चांगले उत्पन्न आणण्याचा प्रयत्न केला आहे परंतु सिंधुदुर्ग,यवतमाळ, गडचिरोली,चंद्रपूर,धाराशिव यासारख्या विभागांनी मात्र अत्यंत सुमार कामगिरी केल्यामुळे महामंडळाच्या एकूण उत्पन्नावर विपरीत परिणाम झाल्याचे दिसून येते.

निर्धारित केलेल्या लक्षात पेक्षा अत्यंत कमी उत्पन्न आणणाऱ्या विभागांच्या कामगिरी बाबत मंत्री सरनाईक यांनी चिंता व्यक्त केली असून सातत्याने तोट्यात राहणाऱ्या विभागांचे योग्य मूल्यमापन करून त्यांच्या कामगिरीत सुधारणा होण्यासाठी एसटी प्रशासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले आहे.

## धाराशिवमध्ये ब्रह्मांडनायक श्री स्वामी समर्थ पालखी सोहळ्याचे १६वे वर्ष –भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचा संगम



धाराशिव (प्रतिनिधी): ब्रह्मांडनायक श्री स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्ट, तांबरी विभाग, धाराशिव यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही अत्यंत भक्तिभावाने आणि वैभवशाली पद्धतीने श्री स्वामी समर्थ पालखी सोहळा २०२५ आयोजित करण्यात आला असून, या वर्षी या सोहळ्याचे १६वे वर्ष साजरे होत आहे. दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ ते ६ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत हा सात दिवसीय पवित्र सोहळा विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सेवाभावी उपक्रमांनी सजणार आहे. या भव्य यात्रेची सुरुवात शुक्रवार, दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० वाजता तांबरी विभागातील गणेश मंदिरात श्री गणेश पूजनाने होईल व महाआरतीनंतर पालखीचे वैभवशाली प्रस्थान होईल. श्री स्वामी समर्थ महाराज की जय! या जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून जाईल. प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या ठिकाणी पालखीचा मुक्काम ठेवण्यात आला असून, नामस्मरण, हरिपाठ, भजन, प्रवचन, महाप्रसाद तसेच भक्तांसाठी चहा-पाण्याची सोय यांची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली आहे. स्थानिक स्वयंसेवक, भक्तगट या पवित्र कार्यात उत्साहाने सहभागी होत आहेत.

या वर्षीच्या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे त्रिपुरारी पौर्णिमा निमित्त धाराशिव ते अक्कलकोट दरम्यान निघणारा पायी पालखी सोहळा. हजारो स्वामीभक्तांचा सहभाग अपेक्षित असून, मार्गभर फुलांच्या उधळणी, स्वामी समर्थ जयघोष आणि भक्तिगीते यांमुळे वातावरण भक्तिमय होणार आहे. या सोहळ्याचा समारोप गुरुवार, दिनांक ६ नोव्हेंबर २०२५ रोजी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान, भक्त निवास मैंदर्गी रोड अक्कलकोट येथे होणार आहे. त्या दिवशी अभिषेक, दर्शन आणि महाआरतीने या दिव्य सोहळ्याचा समारोप होईल. स्वामी समर्थांची पालखी म्हणजे भक्तिभाव, प्रेम आणि सेवाभाव यांचा संगम. या दिव्य सोहळ्यात सहभागी होऊन श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कृपेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक मंडळाने सर्व श्रद्धावान भक्तांना केले आहे.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## पालकांनी वेळीच सावध झाले पाहिजे

शिक्षण क्षेत्रात काळजीचे वातावरण दिसून येत आहे. सध्याला काही ठिकाणी मुलींशी गैरवर्तन, विनयभंग ते बलात्कारापर्यंत अनेक घटना घडलेल्या आहेत. अनेक खासगी क्लासेसमध्येही असे गैरप्रकार उघडकीस आले आहेत. त्यातून अनेक मुलींचा, तरुणींचा जीवही गेला आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील पावित्र्य जपा, असे सांगण्याची गरज निर्माण झाली आहे. मुळातच संस्काराची मोठी गरज असते आणि हे संस्कार प्रथम आपल्या कुटुंबाकडून कळत नकळत मिळत असतात. जाणून-बुजून सुसंस्कृत घडविण्यासाठी शिक्षणाचा आधार घ्यावा लागतो. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो शिक्षण घेईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक जण शिक्षण घेण्याकडे वाटचाल करू लागला. शिक्षणाची वेगवेगळी स्थितीज पादाक्रांत करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेऊ लागला. या क्षेत्रामध्ये स्पर्धाही वाढली आणि आजकाल प्रत्येक जण म्हणतो की हे स्पर्धेचे युग आहे आणि ह्या युगामध्ये टिकायचे असेल तर दर्जेदार शिक्षण, मेहनत या सगळ्या गोष्टी अवगत असल्या पाहिजेत. या सगळ्या स्पर्धेमध्ये प्रत्येकाला वाटायला लागले की, मी डॉक्टर व्हावे, इंजिनिअर व्हावे, कलेक्टर व्हावे, आणखी काहीतरी मोठा अधिकारी व्हावे आणि याहीपेक्षा जास्त अपेक्षा जे मी करू शकलो नाही जे मला मिळाले नाही ते माझ्या मुलाने मुलीने करावे अशा पालकांच्या अपेक्षा वाढलेल्या सर्वत्र दिसून येतात. शाळा, महाविद्यालयातून सर्व काही बाजारीकरण, पांढरपेशी भ्रष्टाचार वाढल्यामुळे त्याला पर्याय म्हणून खासगी क्लासेसची निर्मिती झाली. त्यातून सुरुवातीला गुणवत्तेला वाव मिळत होता. कालांतराने त्याही क्षेत्रांमध्ये अनेक जण उतरले. स्पर्धा निर्माण केली. अनेकजन आपल्या खासगी क्लासेसची जाहिरात प्रत्येकाच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला जाऊ लागला. अलीकडच्या काळात सर्वच नाही मात्र काही शाळा, महाविद्यालये आणि खासगी क्लासेस हे टायअप करून लुटालूट करीत आहेत ही एक वस्तूस्थिती आहे. अशी शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारी कृत्ये करणारे हे तेवढ्या कालावधी पुरते करत नाहीत तर त्यांचे हे काम अनेक वर्षांपासून चालू असल्याचे चित्र अनेक प्रकरणाच्या माध्यमातून बाहेर आलेले आहे. बीड शहरातील एका खासगी क्लासेस, शाळेच्या माध्यमातून एका सतरा वर्षीय गरीब कुटुंबातील मुलीचं लैंगिक शोषणासारखे दुष्कृत्य घडून आले. महाराष्ट्र शासन, केंद्र शासनाने जागृत होऊन अशा घटनांकडे गांभीर्याने लक्ष देण्याचा प्रयत्न करावा. गोरगरीब विद्यार्थ्यांच्या पालकांना लुटणारे तसेच दुराचार करणारे या शिक्षण क्षेत्रामध्ये काम करत असतील तर विद्यार्थ्यांचे विद्यार्थिनींचे भवितव्य अंधकारमय दिसत आहे. याला एकच पर्याय आहे, जसे पूर्वी शाळा, महाविद्यालयातून फक्त शिक्षकांकडूनच शिक्षण दिले जात असायचे. आता मात्र शाळा, महाविद्यालयात प्रवेश घेतला जातो आणि दिवसभर रात्री दहा वाजेपर्यंत खासगी क्लासेसकडे पालक भरमसाठ फीस भरून आपले पाल्य पाठवतात. अशा पालकांनी जागृत राहिले पाहिजे. आपल्या पाल्याची सुरक्षा त्या क्लासेसमध्ये आहे का, त्या क्लासेसमध्ये संचालकापासून सेवकापर्यंत कशा पद्धतीची लोक काम करतात याची पडताळणी केली पाहिजे. ही खबरदारी घेत असतानाच त्या ठिकाणी खरोखरच ट्युशनची गरज आहे का? की फॅशन म्हणून ट्युशन लावायची किंवा इतरांनी केले म्हणून मी करायचे या भूमिकेतून या सगळ्या गोष्टी होत आहेत का? हाही विचार करणे गरजेचे आहे. गोरगरीब विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या पद्धतीने पिळवणूक खासगी क्लासेस, शाळा, महाविद्यालयातून होत असेल तर त्या ठिकाणी शासनाकडून कडक निर्बंध घातले पाहिजेत. आचारसंहिता तयार करून त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे केली पाहिजे. त्यावर देखरेख करण्यासाठी एखादी शासकीय समिती नेमली पाहिजे आणि त्या माध्यमातून या सगळ्या खासगी शिक्षण क्षेत्रावर नजर ठेवली पाहिजे. मुलींनीसुद्धा आपण स्वतः ला कमी न समजता प्रत्येक प्रसंगाला सामोरे जाण्याची क्षमता आपल्यामध्ये निर्माण केली पाहिजे. असे म्हणतात, न्यायाची चाड आणि अन्यायाची चीड प्रत्येकाला असली पाहिजे. म्हणजे आपण प्रत्येकानी न्याय भूमिकेतून जीवन जगले पाहिजे. कोणावरही आपल्याकडून अन्याय होणार नाही, अत्याचार होणार नाही हे वागताना ठरवले पाहिजे आणि ते अमलात आणले पाहिजे. तर अशा पद्धतीचे प्रकार घडणार नाही. राज्यामध्ये, देशामध्ये अशी अनेक प्रकरणे घडतात. ती प्रकरणे आठ पंधरा दिवस, महिनाभर प्रत्येक जण गांभीर्याने त्यावर विचार करतो, प्रतिक्रिया देतो आणि कालांतराने त्याचा विसर पडतो. असा विसर पडता कामा नये. एखाद्या प्रसंगातून धडा घेतला पाहिजे आणि त्या धड्याखाली प्रत्येक बाबीचे उत्तर शोधून त्याची अंमलबजावणी केली पाहिजे तरच हे कुठेतरी थांबेल. यामध्ये फार मोठा शासनाचा सहभाग पाहिजे. कारण कडक कायदे करून त्याची अंमलबजावणी केली तरच लोकांना शिस्त लागते असा आतापर्यंतचा अनुभव आहे. स्वयंशिस्तीने वागणारी माणसे फार कमी आहेत. त्यामुळे लोकशाहीच्या माध्यमातून जर प्रत्येकाला जीवन जगायचे असेल तर प्रत्येकाने स्वयंशिस्त पाळलीच पाहिजे. मुलींनी स्वतःला कोणत्याही पद्धतीने कमी न समजता हिमतीच्या भूमिका मुलींमध्ये असली पाहिजे. अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन करणारा जास्त गुन्हेगार असतो असं डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात, हाही विचार प्रत्येकाने केला पाहिजे. 'बॅड टच, गुड टच' हे आता प्री प्रायमरीलासुद्धा शिकविले जाते. आपणाला ते कळले पाहिजे आणि जर समजा बॅड टचच्या माध्यमातून जर कोणी आपल्या जवळचा किंवा त्या ठिकाणी शिक्षक असो की कोणीही असो तो ओळखता आला पाहिजे. त्याचबरोबर त्याची डोळ्याची नजर ओळखता आली पाहिजे आणि ओळखल्यानंतर स्वतः त्याबाबत तात्काळ आपल्या पालकांशी किंवा आपल्या जवळच्या व्यक्तीशी ते शेअर केले पाहिजे, बोलले पाहिजे आणि वेळप्रसंगी त्याच्यावर कठोर कारवाई करण्यासंदर्भात पाऊल उचलले पाहिजे. जर तुम्ही ते सहन करत बसलात तर तुम्ही आज त्यांच्या शिकार झालेल्या आहात भविष्यात अनेकांना तो शिकार बनवेल आणि त्या अनेकांना शिकार बनवण्यापासून तुम्हीच वाचवू शकता. पुढे जीवनात वाटचाल करा. रडण्यापेक्षा लढणे हेच जीवनाचे सार आहे. मुलींनी कोणत्याही प्रकारे चुकीची घटना घडल्यास किंवा चुकीची घटना घडू शकते असा संशय आल्यास न भीता पोलिसांशी संपर्क साधा. शासनाने, समाजाने अशा दुष्कृत्य करणाऱ्या शिक्षण क्षेत्रातल्या असो किंवा कोणत्याही क्षेत्रातील असो त्या संबंधित व्यक्तीला कठोरातील कठोर शिक्षा केली पाहिजे.

# जागतिक बचत दिन : आर्थिक जबाबदारीचे सामाजिक भान

जागतिकीकरणाच्या, उपभोगतावादाच्या आणि झपाट्याने बदलणाऱ्या आर्थिक व्यवस्थेच्या या युगात 'बचत' ही केवळ आर्थिक क्रिया न राहता ती एक सामाजिक मूल्य, संस्कृती आणि नागरिक जबाबदारी म्हणून पाहिली जाऊ लागली आहे. दरवर्षी ३० ऑक्टोबर रोजी जगभरात साजरा केला जाणारा 'जागतिक बचत दिन ' म्हणजे केवळ आर्थिक संस्थांचा उत्सव नसून, तो व्यक्ती, कुटुंब आणि समाज यांच्या एकत्रित शाश्वत भविष्यासाठीची सजगता दाखवणारा दिवस आहे. या दिवसाची संकल्पना दुसऱ्या महायुद्धाच्या काळानंतर निर्माण झाली. १९२४ मध्ये इटलीतील मिलान येथे झालेल्या पहिल्या International Savings Bank Congress मध्ये या दिनाचे औचित्य जाहीर करण्यात आले. त्यामागील उद्दिष्ट होते की लोकांना बचतीचे महत्त्व समजावून सांगणे, आणि 'थोडे आज राखले तर उद्याचा दिवस सुरक्षित राहील' हा मूलभूत विचार जनमानसात रुजवणे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, 'बचत' ही फक्त पैशाची साठवणूक नाही; ती समाजाच्या मूल्यव्यवस्थेचा आणि सांस्कृतिक शिस्तीचा भाग आहे. प्रत्येक समाजाची आर्थिक रचना त्याच्या सामाजिक वृत्तीवर आधारित असते. मॅक्स वेबर यांनी मांडलेल्या 'Protestant Ethic and the Spirit of Capitalism' या सिद्धांतानुसार, आर्थिक शिस्त, मेहनतीची सवय आणि बचतीची वृत्ती या गोष्टी भांडवलशाहीच्या वाढीस कारणीभूत ठरल्या. यावरून दिसते की बचत ही केवळ वैयक्तिक नव्हे तर सामाजिक परिवर्तनाचीही गुरुकिल्ली आहे. समाजातील प्रत्येक घटकाने जबाबदारपणे संसाधनांचा वापर करणे आणि उद्यासाठी काही राखून ठेवणे हेच शाश्वत समाजाचे लक्षण आहे.

भारतीय समाजाच्या पारंपरिक संरचनेत 'बचत' ही संकल्पना फार जुनी आहे. भारतीय संस्कृतीत 'अर्धेच खा, उरलेले उद्यासाठी राखून ठेवा' अशी जीवनशैली सुचवण्यात आली होती. आपल्याकडे 'मावळता सूर्य पाहून दिवा विझवू नका' अशी म्हण आहे, तिच्यामागेही भविष्याची तयारी, नियोजन आणि शिस्तबद्धता यांचा संकेत आहे. ग्रामिण समाजात पूर्वी घरात धान्य, बियाणे, किंवा पैशाचा थोडासा साठा ठेवण्याची सवय होती. स्त्रिया आपल्या अल्प उत्पन्नातूनही सोन्याचे दागिने, धान्य किंवा थोडेसे पैसे साठवून ठेवत असत हेच प्रत्यक्षात 'घरोघरी बचत संस्कृतीचे' पहिले रूप होते.

आजच्या आधुनिक समाजात मात्र उपभोगतावादाची प्रवृत्ती वाढली आहे. त्वरित समाधान, लक्झरीचा मोह आणि क्रेडिट कार्ड संस्कृती यामुळे 'उद्यासाठी बचत' ही कल्पना मागे पडत चालली आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने हे अत्यंत महत्त्वाचे परिवर्तन आहे. एक काळ असा होता की बचत ही 'मध्यमवर्गीय मूल्यव्यवस्थेचा' आधार होती. पण आता ती हळूहळू 'उपभोगवादी संस्कृतीच्या' प्रभावाखाली दबली आहे. जाहिराती, सोशल मीडिया, ब्रँडेड जीवनशैली, आणि कर्जाधारित अर्थव्यवस्था यांनी व्यक्तीच्या विचारांवर परिणाम केला आहे. 'आत्ताच खर्च करा, नंतर विचार करा' ही मानसिकता नव्या पिढीच्या जीवनशैलीत शिरली आहे. या प्रवृत्तीचा परिणाम केवळ आर्थिक नाही, तर तो सामाजिक आणि सांस्कृतिक अस्थैर्य निर्माण करणारा आहे. समाजशास्त्रानुसार, बचत ही सामाजिक सुरक्षा यंत्रणेचा पाया आहे. जे समाज भविष्यासाठी नियोजन करतात, संसाधनांचे योग्य व्यवस्थापन करतात आणि अनावश्यक खर्च टाळतात, ते समाज संकटकाळात अधिक मजबूत राहतात. उदा. कोविड-१९ महामारीच्या काळात ज्या कुटुंबाकडे थोडीफार बचत होती, त्यांनी रोजगार, उत्पन्न आणि आरोग्य संकटांना अधिक चांगल्या प्रकारे सामोरे गेले. दुसरीकडे, अनियोजित खर्च करणाऱ्या, किंवा 'दिवसेंदिवस जगणाऱ्या' कुटुंबांना अत्यंत आर्थिक ताण सहन करावा लागला. त्यामुळे बचत ही केवळ वैयक्तिक नाही तर सामूहिक सामाजिक स्थैर्याची गुरुकिल्ली आहे.

भारतीय ग्रामीण समाजात बचतीचे रूप 'स्वयं-सहायता गटां'द्वारे अधिक दृढ झाले आहे. महाराष्ट्रातील महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून केवळ आर्थिक स्वावलंबनच मिळवले नाही, तर सामाजिक निर्णय प्रक्रियेतही आपला सहभाग वाढवला आहे. अशा गटांनी बचतीची संस्कृती समाजाच्या तळागाळात रुजवली आहे. याला समाजशास्त्रीय अर्थाने 'ग्रामस्तरीय सामाजिक पूंजी' म्हणता येईल. बचतीद्वारे निर्माण झालेला हा सामाजिक विश्वास आणि सहकार्याचा पाया, समाजातील परस्परावलंबित्व अधिक दृढ करतो.

अर्थशास्त्रज्ञ ॲमर्त्य सेन यांनी सांगितले आहे की, विकास म्हणजे केवळ उत्पन्नवाढ नव्हे तर मानवी क्षमतांची वाढ होय. बचत हे त्या क्षमतावृद्धीचे मूलभूत साधन आहे. बचत आपल्याला स्वावलंबन देते, निर्णयक्षमता वाढवते आणि जीवनातील अनिश्चिततेविरुद्ध सुरक्षा कवच तयार करते. जेव्हा समाजातील प्रत्येक घटक बचतीचे महत्त्व ओळखतो, तेव्हा समाजात 'आर्थिक लोकशाही' मजबूत होते. याचा अर्थ, समाजातील सर्व स्तरांना आपल्या गरजा पूर्ण करण्याची आणि भविष्यासाठी नियोजन करण्याची समान संधी मिळते. जागतिक बचत दिनाचा उद्देश केवळ बँकांमध्ये पैसे ठेवण्यापुरता मर्यादित नाही. त्यामागे एक व्यापक सामाजिक अर्थ आहे, तो म्हणजे 'जबाबदार उपभोग' आणि 'शाश्वत विकास' होय. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, बचत आणि शाश्वतता या एकमेकांशी घट्ट निगडित संकल्पना आहेत. जर प्रत्येक नागरिकाने आपल्या संसाधनांचा वापर मर्यादित केला आणि उद्यासाठी थोडे राखून ठेवले, तर समाजातील विषमता कमी होईल. अशा प्रकारे बचत ही समानतेच्या सामाजिक तत्त्वाची पायाभरणी करते. पण बचत केवळ आर्थिक न राहता ती मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपातही आवश्यक आहे. वेळेची बचत, ऊर्जेची बचत, संसाधनांची बचत हे सर्व 'सामाजिक जबाबदारी'च्या रूपात पाहायला हवे. आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर ऊर्जेची बचत आणि संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन ही समाजशास्त्रीय दृष्टीने 'सामूहिक बचत संस्कृती'चीच विस्तारित रूपे आहेत. समाजातील ही जागरूकताच शाश्वत समाज निर्माण करू शकते.

शिक्षणक्षेत्रातही बचतीची संस्कृती रुजवणे आवश्यक आहे. शाळांमध्ये आर्थिक साक्षरता, बचतीचे महत्त्व आणि संसाधन व्यवस्थापन यावर शिक्षण दिले गेले तर नवी पिढी अधिक जबाबदार नागरिक म्हणून घडेल. जर्मनी, जपान, स्वित्झर्लंडसारख्या देशांनी आपल्या नागरिकांमध्ये लहानपणापासून बचतीची सवय लावली आणि त्यामुळेच त्यांचे समाज आर्थिकदृष्ट्या स्थिर झाले. भारतातही 'पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज', 'जन-धन योजना', 'सुकन्या समृद्धी योजना' अशा उपक्रमांद्वारे सरकारने बचतीचा प्रसार करण्याचे प्रयत्न केले आहेत. पण खरी गरज आहे ती 'बचत ही समाजाचा सांस्कृतिक स्वभाव बनवणे' या उद्दिष्टाची. समाजशास्त्रज्ञ एमिल दुर्खाइम यांनी सांगितले की, समाजातील नैतिक मूल्ये आणि नियम हे समाजाच्या एकात्मतेचे सूत्र आहेत. बचतीची संस्कृतीही असेच एक नैतिक मूल्य आहे. ती व्यक्तीला संयम, आत्मशिस्त आणि उत्तरदायित्व शिकवते. या मूल्यांच्या आधारे समाजात स्थैर्य आणि एकात्मता निर्माण होते. म्हणूनच जागतिक बचत दिन हा फक्त आर्थिक शिक्षणाचा दिवस नाही; तो सामाजिक नैतिकतेच्या पुनर्स्मरणाचा दिवस आहे.

आधुनिक काळातील डिजिटल व्यवहार, ऑनलाइन गुंतवणूकीच्या युगात बचतीची संकल्पना नवे रूप घेत आहे. डिजिटल बँकिंग, यूपीआय, मोबाईल वॉलेट यामुळे व्यवहार सोपे झाले आहेत, पण त्याचबरोबर 'त्वरित खर्च' करण्याची प्रवृत्तीही वाढली आहे. म्हणूनच डिजिटल बचतीचे शहाणपण आवश्यक आहे, म्हणजेच नियोजनपूर्वक गुंतवणूक, सुरक्षित वित्तीय साधनांची निवड आणि फसवणुकीपासून संरक्षण होय. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, ही डिजिटल बचतसंस्कृती म्हणजे 'आधुनिक समाजातील आर्थिक साक्षरतेचा' एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

शेवटी, बचत ही फक्त पैशाची गोष्ट नाही, ती भविष्याची, स्थैर्याची आणि जबाबदारीची गोष्ट आहे. जो समाज आजची गरज आणि उद्याची तयारी यांच्यात समतोल राखतो, तोच समाज खऱ्या अर्थाने प्रगत होतो. म्हणूनच जागतिक बचत दिन हा प्रत्येकाने आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. आपण आज किती खर्च करतो आणि उद्यासाठी किती राखून ठेवतो? समाजशास्त्र सांगते की, व्यक्तीचा विवेकशील आर्थिक निर्णय हा संपूर्ण समाजाच्या प्रगतीचा आरसा असतो. बचत म्हणजे फक्त आर्थिक नियोजन नव्हे, तर सामाजिक शिस्तीचे आणि नैतिक जबाबदारीचे जिवंत प्रतीक आहे. म्हणूनच या जागतिक बचत दिनानिमित्त आपण सर्वांनी ठरवले पाहिजे की बचत करणे म्हणजे फक्त पैसे वाचवणे नव्हे, तर समाजाला स्थैर्य, जबाबदारी आणि शाश्वत भविष्य देणे होय.



डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक,समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२

# सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती : 'राष्ट्रीय एकता दिवस' विशेष स्वरूपात साजरा होणार!

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ३१ ऑक्टोबर 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरा केला जातो. या वर्षी त्यांच्या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने हा दिवस भव्य स्वरूपात साजरा केला जाणार आहे. हा दिवस भारताच्या एकता, अखंडता आणि राष्ट्रीय एकजुटतेचे प्रतीक असून, ५६२ संस्थान एकत्रित येऊन आधुनिक भारताची पायाभरणी करणाऱ्या सरदार पटेलांच्या अद्वितीय कार्याला अभिवादन करणार आहे.

**एकतानगर येथे भव्य परेड आणि सांस्कृतिक कार्यक्रम**

या वर्षीचा उत्सव नैसर्गिक सौंदर्य आणि सांस्कृतिक समृद्धीचा संगम असणाऱ्या गुजरातमधील नर्मदा जिल्ह्यातील एकतानगर येथे आयोजित केला जाणार आहे. हे ठिकाण ''विविधतेत एकता'' या भारताच्या संकल्पनेचे प्रतीक म्हणून निवडले गेले आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे केंद्रीय सशस्त्र पोलीस दल राज्य पोलीस दल आणि राष्ट्रीय कॅडेट कोर यांच्या सहभागाने भव्य परेड आणि सांस्कृतिक उत्सव आयोजित करण्यातआलाआहे.

**राष्ट्रीय कॅडेट्स कोर आणि शालेय बँड यांचेसादरीकरण**

या परेडमध्ये सीमा सुरक्षा बल, केंद्रीय राखीव पोलीस दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, भारत-तिबेट सीमा पोलीस, सशस्त्र सीमा बल तसेच आसाम, त्रिपुरा, ओडिशा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, पंजाब, जम्मू आणि काश्मीर, केरळ आणि आंध्र प्रदेश या राज्यांच्या पोलीस दलांचा सहभाग असेल.घोडदळ आणि उंटदळाचे संच, स्वदेशी जातींच्या श्वानांचे कौशल्यप्रदर्शन, मार्शल आर्ट सादरीकरणे आणि शस्त्रविरहित युद्धकौशल्याची प्रात्यक्षिके या परेडची शोभा वाढवतील.

महिला सक्षमीकरणावर विशेष भर देत, प्रधानमंत्रीयांना दिल्या जाणाऱ्या गार्ड ऑफ ऑनरचे नेतृत्व एक महिला अधिकारी करतील. केंद्रीय औद्योगिक सुरक्षाबल आणि केंद्रीय राखीव बलातील महिला कर्मचाऱ्यांकडून मार्शल आर्ट आणि युद्धकौशल्याचे प्रभावी प्रदर्शन सादर केले जाईल. याद्वारे त्यांचे शौर्य, शिस्त आणि आत्मविश्वास प्रकट होईल. राष्ट्रीय सुरक्षेत विशेष योगदान दिले आहे असे रामपूर हाउंड आणि मुधोल हाउंड हे स्वदेशी श्वान आपली कौशल्ये सादर करतील. विशेष म्हणजे, अखिल भारतीय पोलीस श्वान स्पर्धेत विजेती ठरलेली 'मुधोल हाउंड रिया'या वर्षीच्या परेडमध्ये डॉग स्क्वाडचे नेतृत्व करेल. याशिवाय, गुजरात पोलिसांचे घोडदळ, आसाम पोलिसांचा मोटरसायकल डेअरडेव्हिल शो, सीमासुरक्षाबलचे उंटदळ आणि उंट बँड, तसेच एनसीसी कॅडेट्स आणि शालेय बँड ''एकतेतच शक्ती आहे'' हा संदेश देत परेडमध्ये सहभाग घेतील.भारतीय वायुदलाच्या सूर्यकिरण पथकाकडून सादर होणारा भव्य एअर शो या परेडच्या भव्यतेत आणखी भर घालेल.

''विविधतेत एकता'' संदेशदेणारेसंचलन

राष्ट्रीय एकता दिनी परेडमध्ये विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश यांचे संचालन 'विविधतेत एकता'या विषयाचे दर्शन घडवतील.

या संचालनात राष्ट्रीय सुरक्षा गार्ड, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, गुजरात, जम्मू आणि काश्मीर, अंदमान-निकोबार बेटे, मणिपूर, महाराष्ट्र, छत्तीसगड, उत्तराखंड आणि पुद्दुचेरी यांच्या संचालनाचा समावेश असेल.

यासह सीमासुरक्षाबल, के ंद्रीयराखीवपोलीसदल, केंद्रीयऔद्योगिकसुरक्षाबल, सशस्त्रसीमाबल, दिल्ली पोलीस आणि विविध राज्य पोलीस दलांचे ब्रास बँड कार्यक्रमाच्या उत्सवी वातावरणात अधिक रंग भरतील.

या परेडमध्ये केंद्रीय राखीव पोलीस दलाचे पाच शौर्यचक्र विजेते आणि सीमासुरक्षाबलचे १६ वीरता पदक विजेते सन्मानित केले जातील. या शूर जवानांनी नक्षलविरोधी आणि दहशतवादविरोधी मोहिमांमध्ये, तसेच पश्चिम सीमेवरील 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान, अद्वितीय धैर्य आणि पराक्रमाचे प्रदर्शन घडविले आहे. परेडसोबतच भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाद्वारे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात ९०० कलाकार भारतीय शास्त्रीय नृत्यांचे सादरीकरण करतील, ज्यातून भारताची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि विविधतेतील सौंदर्य अधोरेखित होईल.

राष्ट्रीय एकता दिनाचे उद्दिष्ट नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकता, सौहार्द आणि देशभक्तीची भावना दृढ करणे हे आहे. हा उत्सव प्रत्येक भारतीयाला या मूल्यांचा स्वीकार करण्यासाठी आणि देशाच्या ऐक्याच्या भावनेला बळ देण्यासाठी प्रेरित करतो. १ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत एकतानगर येथे 'भारत पर्व' आयोजित करण्यात येईल. या पर्वात संपूर्ण भारतातील सांस्कृतिक सादरीकरणे आणि खाद्य महोत्सव आयोजित केला जाईल, ज्यामध्ये देशाच्या विविध परंपरांचा संगम पाहायला मिळेल. या पर्वाचा समारोप १५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करून केला जाईल.

-- वर्षा फडके-आंधळे

# आजकालची मुले इतकी चिडखोर का आहेत?



मुले ही देवाघरची फुले असे साने गुरुजी यांनी म्हटलेले आहे. पूर्वी आपणही तसेच म्हणत होतो. त्या काळात तसे म्हणणे बरोबर होते. परंतु आता ही परिस्थिती राहिलेली नाही. आजची मुले ही काळाच्या ओघात, विज्ञानाच्या युगात, सम ोरील परिस्थिती पाहून इतकी हुशार झालेली आहेत की, त्यांना समोर असलेला माणूस हा आपल्यापेक्षा कमी बुद्धीचा आहे की काय असे वाटू लागले आहे. आपणच सर्वात जास्त हुशार आहोत बाकी इतर कोणीच नाहीत. असे ही मुले स्वत:ला आजकाल समजू लागली आहेत. या त्यांच्या समजुतीमुळे आपले स्वत:चे जन्मदाते आई-वडील यांचीही किंमत त्यांना कळेनाशी झाली आहे. त्यांनाही ही मुले उर्मटपणे बोलू लागलेली आहेत.

मुल जन्मल्यानंतर सुमारे एक ते दीड वर्षानंतर त्याला काय हवे काय नको याचे ज्ञान होऊ लागते. मग त्याचे आई वडील व घरातील ज्येष्ठ मंडळी त्या मुलाला तो जे मागेल ते पुरवितात. काही वेळा तो गरजेपेक्षा जास्त वस्तू मागू लागतो. घरातील आई-वडिलांना ज्येष्ठ मंडळींना ते कळत असते. परंतु जाऊदे, असू दे, म्हणून या गोष्टीकडे ते दुर्लक्ष करतात आणि त्या मुलाला जे काय पाहिजे आहे ते त्याला देत असत.

त्यामुळे त्या मुलाला आपल्याला जे मागेल मिळतय असे वाटू लागते आणि त्यामुळे त्याला पुन्हा सतत काही ना काहीतरी मागण्याची सवयच लागते. जसजसे त्याचे वय वाढते तसतसे त्याच्या मागण्याही वाढू लागतात. त्यामुळे त्याला कुठलीही गोष्ट मागण्याची सवय लागून जाते. एकदा का ही सवय लागली की, पुढे या सवयींचे त्याच्या हट्टामध्ये रुपांतर होते. अशी मुले पुढे हट्टी बनतात आणि एकदा का ही मुले हट्टी बनली की पुढे ते कोणाचेच ऐकत नसतात.

मला ही गोष्ट पाहिजे असे ही मुले आपल्या आई-वडिलांना मागतात. मग एखाद्या वेळेस वेळेअभावी म्हणा किंवा पैशाअभावी म्हणा ती गोष्ट आपण जर त्याला पुरवू शकलो नाही, तर ही मुले हट्ट धरून बसतात, कालवा करतात, गोंधळ करतात, रडतात. परंतु या मुलांना आपल्या आई वडिलांची परिस्थिती कशी आहे ? आपण मागीतलेली गोष्ट आपले आई वडील का पुरवत नाहीत ? त्यांना काय अडचण आहे का ? त्यांच्याकडे पैसे नाहीत का ? आपण जे मागतो आहे ते योग्य आहे का ? आपण जी वस्तू मागतो आहोत ती आपल्या किंवा सर्वांच्या उपयोगीची आहे की नाही याचेही ज्ञान त्या मुलाला नसते. फक्त आणि फक्त अमुक एक वस्तू आपल्याला पाहिजे म्हणजे पाहिजेच. एवढेच त्याला कळत असते.

लहान मुलाचे मन म्हणजे मातीचा गोळा त्याला आपण जसा आकार देऊ तसे ते बनते. लहानपणीच त्याला जर आपण योग्य ती सवय लावली तर आजची ही परिस्थिती कदाचित उद्भवणार नाही.

मुलांचा हट्टीपणा वाढण्याचे आणखी एक कारण म्हणजे म ुलांचे टीव्ही पाहणे, निरनिराळे चॅनेल पाहणे, त्यातील मालिका पाहणे, मोबाईल पाहणे हे होय. यातील जे कलाकार असतात त्यांचे अनुकरण करण्याची सवय किंवा हौस या मुलांना लागते. टीव्ही मधील चित्रपटाच्या किंवा चॅनेल मधील मालिकांच्या कथानकानुसार त्यातील मुलांना त्यांचे आई-वडील त्यांच्या लहान मुलाला ते मागतील त्या वस्तू देत असतात. मग त्यांना जसे मिळते तसे आपल्याला का नाही मिळत ? अशी भावना या मुलांच्या मध्ये तयार होते आणि यातूनच मुलांचा हट्टी स्वभाव तयार होतो.

मुले हट्टी होतात. त्यांचा हट्ट जर आपण नाही पुरविला तर मग ते चिडचिडे बनतात. मी तसे करणारच, मी तुमचे ऐकणारच नाही, मी तिकडे जातच असतो, मला आत्ताच्या आत्ता अम ुक एवढी रक्कम मिळालीच पाहिजे. अशा पूर्ण भूतकाळातील वाक्य वापरून ही मुले आपल्या आई वडिलांच्या वरती हक्क दाखवितात.

मला अमुक एक गोष्ट याचे उदाहरण द्यायचे झाल्यास मोबाईल, सायकल, बूट, गाडी, कपडे, आईस्क्रीम अशा वस्तू जर मागितल्या मागितल्या नाही मिळाल्या तर ही मुले आपल्या आई-वडिलांना मी जीव देईन, मी फाशी घेईन, मी नस कापून घेईन, मी विषारी औषध पिईन किंवा मी घरातून निघून जाईन अशा प्रकारच्या धमकी देतात. त्यामुळे बिचाऱ्या आई-वडिलांना अशा हट्टी मुलांचे म्हणणे किंवा मागणी पूर्णच करावी लागते. त्यातल्या त्यात असा हट्ट करणारा मुलगा जर एकुलता एक असेल तर त्या मुलाचे आई वडील व्याकुळ होतात, हतबल होतात. त्यांच्यापुढे या मुलाचा हट्ट पुरवण्या शिवाय दुसरा कुठलाच मार्ग नसतो.

अशी वेळ आपल्यावर किंवा इतर कोणावरही येऊ नये, यासाठी आपण आपल्या मुलाला वेळीच रोखले पाहिजे. आपला मुलगा जे काही मागेल ते त्याला आपण दिले पाहिजे. परंतु, ते देताना घाई घाईत न देता किंवा त्याने मागितल्या मागितल्या ताबडतोब न देता, ती वस्तू त्याच्या हातात देताना ती वस्तू किती किंमतीची आहे, ही वस्तू तू नीट सांभाळून ठेव, तिची मोडतोड होऊ नये, अशी वस्तू आपल्याला पुन्हा घेण्यास जमणार नाही. या गोष्टीची त्याला आपण जाणीव करून द्यावी. याची काळजी घेण्यासाठी त्याला आवर्जून सांगावे. कुठलीही वस्तू वापरताना तिची हेन्डसाळ होऊ नये. याबाबत आपण ही काळजी घ्यावी व त्यालाही काळजी घ्यायला सांगावे. त्याची जबाबदारी त्याच्यावर टाकावी. म्हणजे आपण दिलेल्या वस्तूचे महत्त्व त्याला कळेल. आई वडिलांनी दिलेली ही वस्तू आपणही नीट सांभाळून ठेवावी असे त्याला वाटेल व तो त्याच्या हट्टीपणा पासून थोडा दूर जाईल व हळूहळू त्याची ही सवय मोडेल.

– अनिल जाधव, बार्शी

## निरोगी सवयी

संतुलित आहार: भरपूर भाज्या, फळे, कडधान्ये आणि प्रथिने खा. प्रक्रिया केलेले पदार्थ आणि साखरयुक्त पेये टाळा. नियमित व्यायाम: दररोज शारीरिकदृष्ट्या सक्रिय रहा. नियमित व्यायामामुळे शरीर तंदुरुस्त राहते.पुरेशी झोप: दररोज रात्री पुरेशी आणि शांत झोप घ्या.भरपूर पाणी प्या: दिवसभर पुरेसे पाणी प्यायल्याने शरीर हायड्रेटेड राहते.तणाव व्यवस्थापन: तणाव कमी करण्याचा प्रयत्न करा. ध्यान किंवा इतर आरामदायी तंत्रांचा वापर करा.स्वच्छता: वैयक्तिक आणि सार्वजनिक स्वच्छता पाळा.मद्यपान टाळा: आरोग्यासाठी मद्यपान करणे टाळा. नियमित तपासणी: नियमित आरोग्य तपासणी करून घ्या




# मनाची श्रीमंती!

**कथा : रमेश तांबे**

दिवाळी नुकतीच संपली होती. दिवाळीचे चार-पाच दिवस कसे संपले हे नमिताला कळलेच नव्हते. दिवाळी येणार म्हणून नमिताने किती तयारी केली होती. नवे कपडे काय, नव्या चपला काय. बाबांच्या मागे लागून चक्क सोन्याची एक साखळीदेखील तिने घेतली होती. त्यामुळे नमिता एकदम खुष होती. मोठ्या अभिमानाने सोन्याची साखळी गळ्यात घालून मिरवत होती. आपल्या मैत्रिणींना दाखवत होती. नमिताचे बाबा एका कंपनीत मोठ्या हुद्द्यावर काम करायचे. आईदेखील एका प्रथितयश कंपनीत कामाला होती. त्यामुळे घरात पैसा खेळता होता. आई-बाबांची नमिता ही एकुलती एक मुलगी. त्यामुळे ते तिला काही कमी पडू देत नव्हते. नमिताचे सारे हट्ट पुरविण्यात बाबांना खूप आनंद वाटत असे. पण यामुळे नमिता खूप लाडावलेली आणि हट्टी मुलगी बनली होती. हवा तसा हवा तेव्हा पैसा खर्च करीत होती. लहान वयात तिच्या हातात पैसा खेळू लागला होता. त्यामुळे तिच्या स्वभावात एक हट्टीपणा, अहंमपणा आला होता. स्वतःच्या मैत्रिणीदेखील गाडी, मोठं घर, खिशात पैसा असणाऱ्याच तिने निवडल्या होत्या. नमिताच्या आईच्या ही गोष्ट लक्षात आली होती. पण बाबांचा नमिता म्हणजे जीव की प्राण. त्यामुळे नमिताच्या वागण्या बोलण्याकडे ते नेहमीच दुर्लक्ष करत होते. पण आईला मात्र काळजी वाटत होती. दोन दिवसांपूर्वीच भाऊबीज संपली होती. आईला सख्खा भाऊ नव्हता. पण तिचा चुलत भाऊ या वर्षी पहिल्यांदाच भाऊबीजेसाठी गावाहून मुंबईला येणार होता. त्यामुळे सकाळपासून आईची लगबग सुरू होती. पुरणपोळ्यांचा छान बेत तिने आखला होता. त्याच्यासाठी नवे कपडेसुद्धा आणले होते. सकाळी बरोबर १० वाजता नमिताचा मामा त्याच्या लहान मुलासह घरी आला. घराची बेल वाजली. नमिताने दरवाजा उघडला. तर एक अगदी साधा माणूस आपल्या छोट्या मुलासह दरवाजात उभा होता. पहिल्यांदाच मामा घरी आला होता त्यामुळे नमिताने त्याला ओळखण्याचा प्रश्न नव्हता. पण त्यांचा एकंदरीत गबाळा वेष पाहून नमिताने नाक मुरडले. तोच आई धावत आली. अरे अनिल दादा ये. यशदेखील आलाय का तुझ्यासोबत! आईने मोठ्या प्रेमाने हसून स्वागत केले. मग हातपाय धुवून ते समोरच्या कोचवर बसले. मोठ्या कौतुकाने बघत मामा म्हणाला, अगं ताई हीच का तुझी नमू? केवढी मोठी झाली आहे बघ! पण नमिताच्या कपाळावर आठ्या कायम होत्या.



मग बाबांसोबत मामाच्या गप्पा झाल्या. एवढा वेळ तो लहानगा यश तसाच बसून होता. नमिताने तर त्याच्याकडे ढुंकूनही पाहिले नाही. मग भाऊबीजेचा कार्यक्रम यथासांग पार पडला. आईने भावासाठी नवे कपडे आणले होते ते त्याच्या हातात दिले. मग आई मामाच्या पाया पडली. नमिता हे सारे एका वेगळ्याच नजरेने बघत होती. आईने नमिताला त्या छोट्या यशला ओवाळायला सांगितले. पण नमिताने स्पष्ट नकारच दिला.

जेवण वगैरे आटोपून आईने भावाला अन् भाच्याला निरोप दिला. पण आईचा चेहरा मात्र रागाने नुसता लालेलाल झाला होता. नमिताने यशला ओवाळण्यास नकार दिला त्याचे तिला खूप वाईट वाटले. रागही आला होता. तिने नमिताला विचारले, काय गं नमे का नाही ओवाळलेस यशला? तशी नमिता म्हणाली, हे बघ आई अशा गबाळ्या मुलाला मी कशी काय ओवाळणार. काय त्याचे दिसणे, कसे त्याचे कपडे, अन् बोलणे तर एकदमच गावाकडचे! मला तर तो एकदम गावठीच वाटला बघ! आता मात्र आईच्या रागाचा पारा चढला. तिने नमिताच्या थोबाडीतच ठेवून दिली. ती रागाने थरथरत होती. आई नमिताला म्हणाली, आज तू जिवंत आहेस ना ते याच गावठी मामामुळे लक्षात ठेव! लहानपणी तू किडनीच्या आजाराने आजारी होतीस. किडनी बदलण्याशिवाय पर्याय नव्हता. माझी आणि बाबांची किडनी तुला बसत नव्हती. शेवटी याच तुझ्या गावठी मामाने नको नको म्हणत असताना त्याची एक किडनी तुला दिली म्हणून तू आज जिवंत आहेस. एवढी कृतघ्न असशील असं वाटलं नव्हतं मला. आपल्या भावाचा झालेला अपमान आईला सहन झाला नाही.

आईचे बोलणे ऐकून नमिताच्या पायाखालची वाळूच सरकली. माझे जीवन केवळ या मामामुळे आहे हे समजताच नमिता तीरासारखी धावत घराबाहेर पडली. मामा आणि तिचा मामेभाऊ यश अजूनही एसटी स्टॅण्डवरच उभे होते. तिथे जाऊन तिने मामाची माफी मागितली. त्यांना ती पुन्हा घरी घेऊन आली आणि मोठ्या प्रेमाने, कृतज्ञतेने मामेभावाला ओवाळले. त्याला गोड मिठाई भरवली अन् बाबांनी तिच्यासाठी घेतलेली सोन्याची साखळी तिने यशच्या गळ्यात घातली. आता नमिताचे मन एखाद्या खळाळत्या झऱ्यासारखे स्वच्छ आणि निर्मळ बनले होते. नमिताच्या या कृतीमुळे घरातले वातावरण एकदम बदलून गेले. आई-बाबांच्या डोळ्यांतून घळाघळा पाणी वाहू लागले. नमिताने भावाला मिठी मारली अन् रडत रडत मामाला म्हणाली, मामा, माफ कर. मला तुमच्या मनाची श्रीमंती नाही ओळखता आली.

# खोट्या तक्रारदारांवर कारवाई होणार का?

विशाखा समितीने कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी तपास सुरू केला. ही समिती तक्रारींची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करते, ज्यामध्ये पुरावे गोळा करणे आणि साक्षीदारांच्या मुलाखती घेणे समाविष्ट असते. ही समिती सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार काम करते. विशाखा समितीने चौकशी केलेल्या जिल्हा परिषदेतील तीनपैकी दोन अधिकाऱ्यांना यापूर्वीच क्लीन चीट दिली आहे, तर सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी यांचीही निनावी तक्रार असल्यामुळे चौकशी करण्याची गरज नसल्याची विशाखा समितीने राज्य सरकारला दिलेल्या अहवालात नमूद केले आहे. त्यामुळे या तिनही अधिकाऱ्यांविरोधात आता खोटी तक्रार करणाऱ्यांना किंवा त्यांना पाठबळ देणाऱ्यांवर कारवाई करण्याचे अधिकार शासनाला आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेचे सीईओ काय कारवाई करणार याकडे आता सर्वांचेच लक्ष लागले आहे.

शासकीय कार्यालयात लैंगिक छळाच्या तक्रारी स्वीकारणे, त्यांची चौकशी करणे आणि योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार राज्य शासनाने विशाखा समितीकडे दिले आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांसाठी सुरक्षित आणि आरोग्यपूर्ण वातावरण सुनिश्चित करणे. 'लैंगिक छळ' म्हणजे काय, याबद्दलची माहिती सर्व कर्मचाऱ्यांपर्यंत समितीमार्फत पोहोचवली जाते. समितीमध्ये किमान अर्ध्या सदस्या महिला असणे अनिवार्य तसेच समितीचे नेतृत्व महिला सदस्यानेच करणे आवश्यक आहे. ही समिती तक्रारींची चौकशी करते, महिला कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करते आणि वार्षिक अहवाल सादर करते. त्या अहवालानुसार शासन



पुढे योग्य ती कार्यवाही करत असते. काही महिन्यांपूर्वी नाशिक जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी, जिल्हा परिषदेचे महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रताप पाटील आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर सुधाकर मोरे यांच्या विरोधात विशाखा समितीकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यात समितीने चौकशी केल्यानंतर प्रारंभी डॉ. सुधाकर मोरे आणि त्यानंतर काही दिवसांपूर्वीच प्रताप पाटील यांनाच क्लीन चीट दिली. प्रारंभी डॉ. मोरे आणि त्यानंतर पाटील यांनी आपले नियमित कामकाज सुरू देखील केले. समितीने परदेशी यांच्या चौकशीचा अहवाल राज्य शासनाकडे पाठवला आहे. त्यात परदेशी यांच्याबाबत निनावी तक्रारी आल्यामुळे त्यांच्या चौकशीची गरज नसल्याचे त्या अहवालात स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यामुळे निनावी तक्रारीची दखल घेऊ नये असे शासनाकडून स्पष्टपणे नमूद केल्यानंतरही समितीच्या कामकाजावरच खऱ्या अर्थाने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे या अधिकाऱ्यांच्या करिअरचे काय असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यामुळे परदेशी यांच्याबाबत तर हे सर्व प्रकरण घडवून आणले गेल्याचे बोलले जात आहे. कर्तव्य दक्ष अधिकाऱ्यांवर निनावी तक्रार, मिडिया ट्रायल करण्यामागे नेमके कोण आहे? हे शोधून त्यांच्यावर कारवाई करण्याची खरी गरज आहे. अन्यथा पुढील काळात जिल्हा परिषदेच काय तर अन्य शासकीय कार्यालयात देखील असे प्रकार वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शासकीय कार्यालयात अधिकाऱ्यांमध्ये किंवा अधिकारी अन् कर्मचाऱ्यांमध्ये कामकाजाहून वाद निर्माण होऊ शकतात; परंतु हे वाद वैचारिक अर्थात केवळ उत्तम कामकाजासाठी असतात. हे वाद विशाखा समिती किंवा शासनापर्यंत जाऊ नये याची दोन्ही बाजूने खबरदारी घेण्याची खरी गरज आहे. विशाखा समितीकडे निनावी तक्रार करण्यामागे स्वतःची ओळख लपवणे हा जरी हेतू असला तरी आपल्या हक्काचा दुरुपयोग झाल्याचे या प्रकरणातून प्रथम दर्शनी दिसते. तक्रारदार महिलांना महिला हक्क आयोग हा देखील पर्याय उपलब्ध होता. जिल्हा परिषदेतील अंतर्गत राजकारण, वर्चस्ववाद, कुरघोडी आणि विशिष्ट खुर्चीसाठी सुरू असलेली लॉबिंग, काही दुखावलेल्या संघटना ही प्रमुख कारणे देखील या प्रकरणामागे समोर येत आहे; परंतु आता जिल्हा परिषदेत विश्वासार्हता निर्माण होण्यासाठी प्रमुख असलेल्या मुख्य अधिकारी कार्यकारी यांनी आपले दालन विभागप्रमुखापासून ते सर्वसामान्य कर्मचाऱ्यांपर्यंत खुले ठेवण्याची गरज आहे. जिल्हापरिषद प्रमुखांशी ते थेट कोणत्याही अडचणी किंवा विषयावर बोलू शकतात. पुढील काळात तरी असे प्रकार होऊ नये यासाठी शासनाने तरी दक्षता घ्यावी अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करू या.

मिनी मंत्रालयात एक प्रकारे षडयंत्रच यापूर्वी जिल्हा परिषदेत इतर अनेक कारणांनी अधिकारी वादात सापडले होते. परंतु मिनी मंत्रालयाच्या इतिहासात पहिल्यांदाच तिघा विभाग प्रमुखांविरोधात तक्रारी येण्याची पहिलीच वेळ आहे. विशाखा समितीची पुनर्रचना केल्यानंतर दोन दिवसात पहिली तक्रार प्राप्त झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. वर्ग एकच्या चौकशी समितीत विभागीय आयुक्त असणे आवश्यक असल्याचा शासन निर्णय आहे. समितीत बाहेरच्या सदस्यांचा समावेश करणे बंधनकारक आहे. मात्र एकही सदस्यांचा समावेश करण्यात आलेला नव्हता. समितीच्या अध्यक्षपदी वरिष्ठ ऐवजी कनिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली, त्यामुळे ही समिती वादात सापडल्याची चर्चा होती. तिघांपैकी एकही अधिकाऱ्यांविरोधात आरोप सिद्ध न झाल्यामुळे हे एक प्रकारे षडयंत्रच असल्याचे बोलले जात आहे. दोघे अधिकारी त्यांच्या पदावर रुजू झाले आहेत. तसेच तत्कालीन सी. इ. ओ. असताना तक्रारी यायच्या, परंतु नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी आल्यापासून एकही तक्रार प्राप्त झालेली नाही. दरम्यान, एका पेन ड्राईव्हची देखील चर्चा देखील आजतागयात जिल्हा परिषद वर्तुळात रंगत आहेत. त्यात नेमकेकी काय होते याबाबत सर्वांनाच प्रश्न निर्माण झाला आहेत.

– धनंजय बोडके

## वैवाहिक जीवनासाठी प्राचीन नियम व फायदे



प्राचीन नियमांप्रमाणे सहवास केल्याने वंशवृद्धी, मैत्रीलाभ, साहचर्य सुख, मानसिक परिपक्वता, दीर्घायू, शारीरिक आणि मानसिक आरोग्याची प्राप्ती होते. पुरातन काळात दंपती प्रत्येक रात्री भेटत नव्हते. संतती प्राप्ती या उद्देश्याने ते शारीरिक सुखाचा आनंद घ्यायचे.

**नियम**

परस्त्री किंवा परपुरुषासोबत शारीरिक संबंध स्थापित करू नये अर्थात पती-पत्नीने आपसात सहवास करावा.आणि अध्यापक निवास स्थळी संभोग करू नये.

## डॉक्टर टीप्स



## विनोद




वनोद

शिट्टी

शिक्षकांनी रागाने विचारले, वर्गात शिट्टी मारण्याची हिंमत कोणी केली?

दामू तू तर नाही ना वाजविली शिट्टी?

दामू (खडबडून) : मी नाही सर कारण मी तर झोपलो होतो.

## संदेश

Santa: bhaisaab, yahaa se mumbai kitna door hai?

Vyakti: 400 km.

Santa: baap re, mujhe aaj hi vaapas lautnaa hai. mumbai se yahaa tak kitnaa door hai?

## सुविचार

हे विश्व मनुष्याला तत्त्वचिंतन करता यावं या उद्देशाने अस्तित्वात आहे.

**केदार जोशी**

### संस्कृत सुभाषित



**गुरू सुखाचा सागरू । गुरू प्रेमाचा आगरू ।**
**गुरू धैर्याचा डोंगरू । कदाकाळी डळमळी ना ।।**

अर्थ – चैतन्य आणि प्रसन्नता हे शिक्षकाचे आणखी महत्त्वाचे गुण आहेत. तो स्वत:च चैतन्यवादी हवा. त्याच्यासमोर तर आपल्या जीवनातील अगदी उमलणाऱ्या वयातील विद्यार्थ्यांचा उत्साही चमूच असतो. त्याच्या सहवासात तर शिक्षक आणखीच उल्हसित होतात.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. उगीच
६. भीतीदायक
११. नखरेल चाल
१३. रणक्षेत्र
१६. मडके
१७. घाव
१८. गणिती नमुना
१९. डाळीचे पीठ
२०. आई (इंग्रजी)
२१. बूड
२२. शेवट
२३. कवी
२५. पृथ्वी
२७. कॉफीप्रमाणे याचेही व्यसन लागू शकते
२८. आंधळा (हिंदी)
३०. महाराष्ट्राची देवी
३२. डाग, वस्तू
३४. संध्याकाळ
३६. मिंधा
३८. हिंदू आणि बौद्ध लोकांचे तीर्थक्षेत्र
४०. तृण
४१. दया, कीव
४२. अलमारी, कवाड
४४. अथवा, किंवा
४६. जय मिळवून देणारा
४८. समाजसेवक मेधा यांचे आडनाव
५१. हेतुपुरस्सर
५२. नम्र, वाकलेला
५३. समोर, देखत
५४. करमणूक करणारे
५६. गायीगुरे
५७. मोजणी
५९. दरारा, भीती
६०. किंमत
६१. कामदेव
६२. मारणे, चोपणे
६५. सत्य, खरे
६६. बोटाच्या टोकावरील कडक आवरण
६७. विद्या
६९. पांग, मेहेरबानी
७१. मत्स्य
७२. येणारा आगामी काळ
७३. देह, काया
७४. खराब
७५. शरीरासह
७६. लग्नानंतर उणेदुणे काढण्यासाठी पुराण्या लग्नातील गोष्टी

### उभे शब्द

१. प्रचंड आरडाओरड
२. साठलेला केर
३. श्वासाचे इंद्रिय
४. काटकसर
५. अनुमती
६. पत्र (हिंदी)
७. रसपूर्ण
८. उणीव, वाळवी
९. चंद्राची कड
१०. न्यून
१२. भीती
१४. पाठीतील हाड
१५. समस्त प्राणीमात्रांच्या मूलभूत गरजा
१८. '----- जाणिजे यज्ञकर्म'
२०. या धान्याची कणसे भाजून खातात
२२. काळोख
२४. घोड्याचे घर
२५. मालक
२६. मुंबईचा घरगडी
२८. वरवधूमध्ये धरला जाणारा पडदा
२९. सततची हालचाल
३१. एक तंतूमय वनस्पती
३३. मैत्रीचे मेतकूट
३५. गती
३७. चक्र
३९. कष्ट, मेहनत, त्रास
४२. कपाळ फुटणे
४३. रोखलेली नजर
४५. मध
४६. सीतेचे वडील
४७. जोरदार शहानिशा
४९. सैन्याचा दाणागोटा
५०. लिहिता, वाचता येणे
५१. मनाची तृप्ती, आनंद
५५. अटीची भाषा
५६. चेहरा, मुख
५८. नवरा (ग्रा.)
६३. वाघाची आरोळी
६४. पूर्वज
६७. खाटिक
६८. शुद्ध, पावन
७०. अरण्य
७१. खवा
७३. पर्वा

### आडवे उत्तरे

१.हकनाक ६.खतरनाक ११.लचकत मुरडत १३.समरभूमी १६.करा १७.वार १८.उदाहरण १९.बेसन २०.मदर २१.तळ २२.अंत २३.गीतकार २५.धरा २७.चहा २८.अंधा ३०.भवानीमाता ३२.नग ३४.कातरवेळ ३६.लाचार ३८.गया ४०.गवत ४१.कणव ४२.कपाट ४४.वा ४६.जयावह ४८.पाटकर ५१.सहेतूक ५२.नत ५३.समक्ष ५४.रंजक ५६.वसू ५७.मोजदाद ५९.धाक ६०.दर ६१.मदन ६२.ताडन ६५.तथ्य ६६.नख ६७.कला ६९.उपकार ७१.मासा ७२.भविष्यकाळ ७३.तन ७४.वाईट ७५.सदेह ७६.मानपान

### उभे उत्तरे

१.हलकल्लोळ २.कचरा ३.नाक ४.कतरबेत ५.परवानगी ६.खत ७.रसदार ८.कसर ९.कोर १०.कमी १२.डर १४.मणका १५.भूकतहान १८.उदर भरण नोहे २०.मका २२.अंधार २४.तबेला २५.धनी २६.रामा २८.अंतरपाट २९.वळवळ ३१.ताग ३३.गट्टी ३५.वेग ३७.चाक ३९.यातायात ४२.कपाळमोक्ष ४३.टक ४५.मकरंद ४६.जनक ४७.हडसून खडसून ४९.रसद ५०.साक्षरता ५१.समाधान ५५.जरतर ५६.वदन ५८.दादला ६३.डरकाळी ६४.बापजादे ६७.कसाई ६८.पवित्र



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### टी२० च्या दोन दिग्गजांची वाईल्ड कार्ड एन्ट्री

मुंबई–मुंबई इंडियन्सने आगामी हंगामासाठी सर्वात मोठी डील केली आहे.या डीलनुसार मुंबई इंडियन्सने टी२० फॉरमॅटच्या दोन दिग्गज खेळाडूंची संघात वाईल्डकार्ड म्हणून सामील केले आहे.त्यामुळे आगामी हंगामात हे दोन खेळाडू मुंबईकडून खेळताना दिसणार आहे. हे दोन्ही अनुभवी खेळाडू आहेत, तसेच दोघांनी अनेक ट्रॉफीस जिंकल्या आहेत.त्यामुळे दोन्ही खेळाडूंच्या या अनुभवाचा मुंबई इंडियन्सला मोठा फायदा होणार आहे.त्यामुळे हे खेळाडू नेमके कोण आहेत?हे जाणून घेऊयात.खरं तर मुंबई इंडियन्सची फ्रेंचायजी असलेली एमआय एमिरेटस ही इंटरनॅशनल लीग टी२० (घ्ध्ऊ२०) लीग खेळते.या लीगच्या चौथ्या हंगामाला पुढच्या २०२६ या वर्षी सुरूवात होणार आहे.तत्पुर्वी एमआय एमिरेटस मोठी डील करत किरॉन पोलार्ड आणि निकोलस पूरन या दोन खेळाडूंना वाइल्डकार्ड म्हणून संघात सामील केले आहे. किरॉन पोलार्डने २०२४ मध्ये खड्ढ२० ट्रॉफी जिंकली होती.ज्यामुळे त्याचे पाच आयपीएल जेतेपद, दोन चॅम्पियन्स लीग टी२० ट्रॉफी आणि दोन मेजर लीग क्रिकेट (चड्उ) ट्रॉफी वाढल्या.वेस्ट इंडिजचा हा माजी खेळाडू त्याच्यासोबत भरपूर अनुभव घेऊन येतो.

***

### सामना पावसामुळे रद्द, आता दुसरी मॅच कधी होणार?

कॅनबेरा–भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातला पहिला टी–२० सामना पावसामुळे रद्द करण्यात आला आहे. या सामन्यात भारताने ९.४ ओव्हरच बॅटिंग केली, पण त्यातही दोनवेळा पावसाने व्यत्यय आणला. पाऊस थांबत नसल्यामुळे अखेर अंपायर आणि मॅच रेफ्रीने सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला. या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्शने टॉस जिंकून पहिले बॉलिंगचा निर्णय घेतला, यानंतर भारताने ९.४ ओव्हरम ध्ये एक विकेट गमावून ९७ रन केले. सूर्यकुमार यादवने २४ बॉलमध्ये नाबाद ३९ आणि शुभमन गिलने २० बॉलमध्ये नाबाद ३७ रन केले. अभिषेक शर्मा १४ बॉलमध्ये १९ रन करून आऊट झाला.आशिया कप विजयानंतर टीम इंडिया पहिल्यांदाच टी–२० फॉरमॅट खेळण्यासाठी मैदानात उतरली होती. या साम न्यात भारतीय टीम दोन फास्ट बॉलर आणि दोन स्पिनरसह दोन ऑलराऊंडरना घेऊन खेळत होती. फास्ट बॉलिंगची जबाबदारी जसप्रीत बुमराह आणि हर्षित राणा यांच्यावर होती, तर वरुण चक्रवर्ती आणि कुलदीप यादव हे दोन स्पेशलिस्ट स्पिनर होते.

***

### स्टार खेळाडू पहिल्या 3 टी२० मधून बाहेर

कॅनबेरा–ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी–२० सीरिजमध्ये टीम इंडियाला मोठा धक्का बसला आहे. टीम इंडियाचा ऑलराऊंडर नितीश कुमार रेड्डी ५ टी–२० मॅचच्या या सीरिजमधल्या पहिल्या ३ टी–२० मॅचमधून बाहेर झाला आहे. ऍडलेडमध्ये झालेल्या तिसऱ्या वनडे मॅचच्या वेळी नितीश कुमार रेड्डीला दुखापत झाली होती. या दुखापतीमुळे नितीश कुमार रेड्डी पहिल्या टी–२० मध्येही खेळला नाही. या सामन्याआधी बीसीसीआयने रेड्डीच्या दुखापतीबाबत माहिती दिली. हा सामना पावसामुळे रद्द करण्यात आला.

'नितीश कुमार रेड्डी पहिल्या तीन टी–२० सामन्यांमध्ये खेळू शकणार नाही. ऍडलेडमध्ये झालेल्या दुसऱ्या वनडेमध्ये नितीशच्या डाव्या मांडीला दुखापत झाली होती. यानंतर त्याने मानेच्या दुखापतीचीही तक्रार केली, ज्यामुळे त्याला ३ सामने खेळता येणार नाहीत', असं बीसीसीआयने त्यांच्या निवेदनात म्हटले आहे.

***

### दक्षिण आफ्रिकेच्या सी टीम कडून पाकिस्तानचा पराभव

**रावळपिंडी** –रावळपिंडी क्रिकेट स्टेडियममध्ये दक्षिण आफ्रिकेने अशी अप्रतिम कामगिरी केली, जे आजवर कोणत्याही संघाला जमली नव्हती. पाकिस्तानविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी२० मालिकेच्या पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करत ५५ धावांनी शानदार विजय मिळवला आणि मालिकेत १–० अशी आघाडी घेतली. विशेष म्हणजे, रावळपिंडीच्या टी२० आंतरराष्ट्रीय इतिहासात ही पहिलीच वेळ होती, जेव्हा प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघाने सामना जिंकला. खरंतर दिग्गजांनी सजलेल्या पाकिस्तानचा दक्षिण आफ्रिकाच्या सी टीमने पराभव केला.२८ ऑक्टोबर रोजी झालेल्या या सामन्यात नाणेफेक हरल्यानंतर दक्षिण आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत ९ गडी गमावून १९४ धावा केल्या. संघाकडून सलामीवीर रीजा हेंड्रिक्सने ४० चेंडूत ६० धावांची दमदार खेळी साकारली, ज्यात ५ चौकार आणि १ षटकाराचा समावेश होता. अखेरच्या टप्प्यात जॉर्ज लिंडेने २२ चेंडूत ३६ धावा झटपट फटकावत संघाचा स्कोर जवळपास २०० वर नेला.

शाहीन आफ्रिदीला दक्षिण आफ्रिकाने चांगलाच धुतला, त्याला

## पहिला टी२० भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया सामना पावसामुळे रद्द



ऑस्ट्रेलिया : मनुका ओव्हल मैदानावर भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळला जाणारा पहिला टी२० सामना अखेर सततच्या पावसामुळे रद्द करण्यात आला.

भारताने दमदार सुरुवात करताना १० षटकांत फक्त १ विकेट गमावून ९७ धावा केल्या होत्या, मात्र त्यानंतर पावसाने पुन्हा मैदानावर हजेरी लावली आणि सामना पुढे सुरू होऊ शकला नाही.

भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव आणि सलामीवीर शुभमन गिल यांनी प्रभावी कामारी केली. दोघांनी मिळून दुसऱ्या विकेटसाठी ३५ चेंडूत ६२ धावा जोडल्या. सूर्यकुमारने आक्रमक फलंदाजी करत २४ चेंडूत ३९ धावा, तर गिलने आकर्षक फटकेबाजीसह २० चेंडूत ३७ धावा काढल्या. त्यांच्या या भागीदारीमुळे भारताने ऑस्ट्रेलियावर सुरुवातीपासूनच दबाव निर्माण केला होता.

त्याआधी, युवा फलंदाज अभिषेक शर्माने चार चौकारांसह १४ चेंडूत १९ धावा केल्या, पण तो नाथन एलिसच्या गोलंदाजीवर बाद झाला. विकेट गमावल्यानंतरही भारताने आक्रमक खेळ कायम ठेवत फलंदाजीवर नियंत्रण मिळवले होते.

पावसामुळे सामन्याच्या सुरुवातीला खेळ उशिरा सुरू झाला आणि सामना २० ऐवजी १८ षटकांपर्यंत मर्यादित करण्यात आला होता. मात्र हवामान पुन्हा बिघडल्याने खेळ रद्द करण्याचा निर्णय घ्यावा लागला.

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्श यांनी नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला होता, परंतु भारतीय फलंदाजांनी त्यांच्या गोलंदाजांना कोणताही वाव दिला नाही.

सूर्यकुमार आणि गिलच्या जबरदस्त फटकेबाजीने भारताने मोठ्या धावसंख्येच्या दिशेने वाटचाल सुरू केली होती, पण अखेर पावसाने सामन्याचा रंग उडवला.

भारताने मिळवलेली उत्कृष्ट सुरुवात व्यर्थ ठरली, आता दोन्ही संघांना मालिकेतील पुढील सामन्याकडे लक्ष द्यावे लागणार आहे.भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसरा टी२० सामना शुक्रवार ३१ ऑक्टोबरला खेळवला जाणार आहे. भारतीय वेळेनुसार हा सामना दुपारी १:४५ वाजता सुरू होईल.

## हरमनप्रीत कौर आणि तो ऐतिहासिक विक्रम

### ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सेमीफायनल पूर्वी त्या १७१ धावांची चर्चा!



**नवी दिल्ली :** आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात होणाऱ्या सेमीफायनल (उपांत्य फेरी) सामन्यापूर्वी, भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर हिच्या एका अविस्मरणीय खेळीची आठवण पुन्हा ताजी झाली आहे. ही केवळ एक खेळी नव्हती, तर आठ वर्षांपूर्वी ऑस्ट्रेलियन संघाला वर्ल्ड कपमधून बाहेर काढणारा तो ऐतिहासिक क्षण होता.

सामन्याचे ठिकाण जरी वेगळे असले तरी, आज (गुरुवारी) नवी मुंबईच्या डीवाय पाटील स्टेडियमवर ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळण्यापूर्वी, भारतीय संघ त्याच 'हरमनप्रीत मॅजिक'च्या शोधात असेल.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील महिला विश्वचषकाच्या इतिहासात, २०१७ च्या सेमीफायनलला एक खास स्थान आहे. स्थळ होते डर्बी, इंग्लंड येथे. त्या सामन्यात हरमनप्रीत कौरने ११५ चेंडूंमध्ये १७१ धावांची (नाबाद) खेळी केली होती. या खेळीत २० चौकार आणि ७ गगनभेदी षटकार मारले होते. हरमनप्रीतच्या या स्फोटक खेळीमुळेच भारताने बलाढ्य ऑस्ट्रेलियाला हरवून वर्ल्ड कपच्या अंतिम फेरीत धडक मारली होती.

हा केवळ विजय नव्हता, तर या खेळीमुळे भारतात महिला क्रिकेटकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला, असे मानले जाते.

**पुन्हा एकदा जादूची गरज**–आज, भारतीय संघ पुन्हा एकदा विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियासमोर उभा आहे. आकडेवारी पाहिली तर ऑस्ट्रेलियाचे पारडे जड आहे, कारण साखळी फेरीतील शेवटच्या सामन्यात भारताला त्यांच्याकडून पराभव पत्करावा लागला होता. भारतासाठी उपकर्णधार स्मृती मानधना हिचा फॉर्म सर्वात मोठा आशेचा किरण आहे. स्मृतीने ऑस्ट्रेलियाविरुद्ध नेहमीच चांगली फलंदाजी केली आहे आणि ती सध्या वर्ल्ड कपमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांपैकी एक आहे. कर्णधार हरमनप्रीत कौरला मात्र या वर्ल्ड कपमध्ये बॅटने खास कामगिरी करता आलेली नाही. त्यामुळे, २०१७ सारखाच मोठा आणि निर्णायक परफॉर्मन्स देण्यासाठी तिच्यावर मोठे दडपण असेल. भारतीय संघ साखळी फेरीत सातत्याने कामगिरी करू शकला नाही, पण नॉकआऊट सामन्यांमध्ये ते मोठी उलथापालथ घडवण्याची क्षमता ठेवतात, हे इतिहास सांगतो.

## भारताला मोठा धक्का: दुखापतीमुळे नितीश कुमार रेड्डी तीन टी–२० सामन्यांमधून बाहेर!



कॅनबेरा : भारतीय क्रिकेट संघासाठी धोक्याची घंटा वाजवणारी बातमी समोर आली आहे. बीसीसीआयने बुधवारी दिलेल्या अपडेटनुसार, तरुण अष्टपैलू नितीश कुमार रेड्डीच्या मानेतील दुखापतीमुळे त्याच्या पुनरागमनाच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला आहे. या दुखापतीमुळे त्याच्या फिटनेस आणि हालचालींवर परिणाम झाल्याचे अधिकृत निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

२२ वर्षीय रेड्डीला २३ ऑक्टोबर रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात डाव्या क्वॅड्रिसेप्सची दुखापत झाली होती. या दुखापतीमुळे तो सिडनीत झालेल्या त्या सामन्यात खेळू शकला नाही. त्या लढतीत भारताने दमदार कामगिरी करत नऊ विकेट्सने विजय मिळवला आणि मालिकेतील फरक २–१ असा कमी केला. सध्या भारतीय संघाला त्यांच्या प्रमुख अष्टपैलू हार्दिक पंड्याच्या अनुपस्थितीचा फटका बसला आहे. हार्दिक अजूनही क्वाड्रिसेप्स दुखापतीतून सावरण्याच्या प्रक्रियेत आहे. मात्र, संघासाठी सकारात्मक बाब म्हणजे दुसरा सीम–बॉलिंग ऑलराउंडर शिवम दुबे आता पूर्णपणे तंदुरुस्त असून, रणजी ट्रॉफीतील पहिल्या फेरीत पाठीच्या दुखण्यामुळे बाहेर राहिल्यानंतर तो कॅनबेरामध्ये झालेल्या पहिल्या टी–२० सामन्यासाठी संघात पुनरागमन करत आहे. रेड्डीचे दुखापतींशी नाते काही नवीन नाही. या वर्षीच त्याला अनेकदा फिटनेस समस्यांना सामोरे जावे लागले आहे. जुलै महिन्यातील इंग्लंड दौऱ्यात, गुडघ्याच्या दुखापतीमुळे त्याला चौथ्या आणि पाचव्या कसोटीतून बाहेर पडावे लागले होते. त्यानंतर जिममध्ये सराव करताना मानेच्या स्नायूंना इजा झाल्याने त्याची समस्या आणखी वाढली. नोव्हेंबर २०२४ मध्ये पर्थ कसोटीत पदार्पण केल्यापासून रेड्डीने भारतासाठी आतापर्यंत १५ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत आणि त्याच्या ऑलराउंडर क्षमतेने प्रभाव पाडला आहे.

## टी२० मध्ये पुन्हा पावसाचे विघ्न: २० ऐवजी १८ षटकांचा सामना !



कॅनबेरा : कॅनबेरातील मनुका ओव्हल स्टेडियमवर सुरू असलेल्या भारत–ऑस्ट्रेलिया पहिल्या टी२० सामन्यात पुन्हा एकदा पावसाने खेळात व्यत्यय आणला आहे. आकाशात अचानक दाटलेले ढग आणि सततचा हलका पाऊस यामुळे खेळाडूंना पुन्हा मैदान सोडावे लागले. पावसामुळे झालेल्या दीर्घ विलंबानंतर सामन्याचा कालावधी २० ऐवजी १८ षटकांपर्यंत मर्यादित करण्यात आला आहे.सामन्याच्या सुरुवातीला भारतीय संघाने दमदार सुरुवात केली होती. अभिषेक शर्मा आक्रमक खेळ करताना १४ चेंडूंमध्ये १९ धावा करून नॅथन एलिसच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्याच्या बाद झाल्यानंतर शुभमन गिल आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांनी जबाबदारी घेत भारताचा डाव स्थिर ठेवला. दोघांनी सर्व बाजूंनी आकर्षक फटकेबाजी करत धावगती कायम ठेवली आणि भारतीय फलंदाजीवर नियंत्रण मिळवले.

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्श यानी नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. ओलसर हवामानामुळे गोलंदाजांना स्विंग मिळू शकेल, या आशेवर त्यांनी हा निर्णय घेतल्याचे दिसून आले.

भारतासाठी चिंतेची बाब म्हणजे अष्टपैलू नितीश कुमार रेड्डी दुखापतीमुळे या मालिकेतील तीनही सामने गमावणार आहे. त्याच्या अनुपस्थितीमुळे टीम इंडियाला अष्टपैलू पर्यायांच्या कमतरतेचा सामना करावा लागत आहे.

सध्या पावसामुळे सामना तात्पुरता थांबलेला असला तरी, मैदान कोरडे झाल्यानंतर खेळ पुन्हा सुरू होईल अशी अपेक्षा आहे.

चाहत्यांच्या नजरा आता सूर्यकुमार यादव आणि शुभमन गिलच्या जोडीवर खिळल्या आहेत कारण त्यांच्या फलंदाजीवरच भारताचा डाव उंच झेपावेल.

## ७ महिन्यांच्या गर्भवती सोनिकाने जिंकले वेटलिफ्टिंग स्पर्धेत कांस्य पदक




दिल्ली : आयुष्यात काहीही अशक्य नाही, फक्त जिद्द असायला हवी. दिल्ली पोलीस कॉन्स्टेबल सोनिका यादव यांनी हे खरे सिद्ध केले आहे. सात महिन्यांची गर्भवती असताना, सोनिकाने अशी उल्लेखनीय कामगिरी केली की तिच्या दृढनिश्चयाचे सर्वत्र कौतुक झाले. तिचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

ऑल इंडिया पोलीस वेटलिफ्टिंग क्लस्टर २०२५–२६ आंध्र प्रदेशात आयोजित करण्यात आले होते. कॉन्स्टेबल सोनिका यादवने केवळ सहभाग घेतला नाही तर इतिहासही रचला. ती सात महिन्यांची गर्भवती असताना तिने १४५ किलोग्रॅम वजन उचलून वेटलिफ्टिंगमध्ये कांस्य पदक जिंकले. जेव्हा सोनिकाने चॅम्पियनशिप स्टेजवर पाऊल ठेवले तेव्हा कोणीही तिच्या कामगिरीचा अंदाज लावू शकत नव्हते. लोकांना वाटले की तिने अधिक वजन उचलण्यासाठी तिचा वर्ग बदलला आहे. जेव्हा तिने १४५ किलोग्रॅम वजन उचलले, तेव्हा सर्वजण आश्चर्यचकित झाले.

सुरुवातीला, सोनिया गर्भवती आहे हे कोणालाही कळले नाही, कारण तिने सैल कपडे घातले होते. बेंच प्रेसनंतर, जेव्हा पतीने तिला उठण्यास मदत केली, तेव्हा स्टेडियममध्ये टाळ्यांचा कडकडाट झाला. सोनिकाला मे महिन्यात कळले की ती गर्भवती आहे. तिच्या पतीनेही विचार केला होता की, ती तिच्या गरोदरपणात जिममध्ये जाणे आणि प्रशिक्षण थांबवेल; परंतु सोनिकाने तसे केले नाही. ती थांबणार नाही असा तिचा दृढनिश्चय होता. ती म्हणते की या धाडसामुळे तिला चॅम्पियनशिपमध्ये कांस्य पदक जिंकण्यास मदत झाली. याच स्पर्धेत सोनियाने १२५ किलो स्कॅट केले, ८० किलो बेंच प्रेस केले आणि १४५ किलो डेडलिफ्ट केले. ती म्हणते की तिने इंटरनेटवर शोध घेतला आणि लुसी मार्टिन्स नावाच्या महिलेने तिच्या गरोदरपणात असाच पराक्रम केल्याचे आढळले. त्यानंतर सोनियाने इंस्टाग्रामवर लुसीशी संपर्क साधला आणि तिला प्रशिक्षण टिप्स विचारल्या. यानंतर तिने तसेच केले.

## विराट, शुभमनला धक्का! रोहित शर्मा अव्वल, अय्यरलाही फायदा; आयसीसी क्रमवारी जाहीर



मुंबई– आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीच्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर, भारतीय सलामीवीर रोहित शर्मा याने बुधवारी (२९ ऑक्टोबर २०२५) आयसीसीने जाहीर केलेल्या नव्या एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले. ३८ वर्षीय रोहित शर्मा हा आयसीसी क्रमवारीत अव्वल स्थान मिळवणाऱ्या सर्वात वयस्कर फलंदाजांपैकी एक ठरला आहे. आपल्या दीर्घ क्रिकेट कारकिर्दीत रोहितने पहिल्यांदाच ही कामगिरी साध्य केली आहे.

रोहितने आपल्या रेटिंगमध्ये तब्बल ३६ गुणांची भर घालत ७४१ वरून ७८१ गुणांपर्यंत मजल मारली. यामुळे त्याने भारतीय संघसहकारी आणि सध्याचा कसोटी व वनडे कर्णधार शुभमन गिल याला मागे टाकत पहिला क्रमांक मिळवला. यापूर्वी २०१९ च्या विश्वचषकादरम्यान रोहित ८८२ रेटिंग गुणांसह दुसऱ्या स्थानी पोहोचला होता. त्या वेळी त्याने विक्रमी पाच शतके झळकावली होती.



सात महिन्यांच्या विश्रांतीनंतर एकदिवसीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करताच रोहितने पुन्हा एकदा आपल्या बॅटने वर्चस्व गाजवले. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या मालिकेत तो सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. त्याने तीन डावांत २०२ धावा केल्या, ज्यात एक शतक आणि एक अर्धशतकाचा समावेश आहे. त्याचा फलंदाजीचा सरासरी तब्बल १०१ इतका होता. या दमदार कामगिरीच्या जोरावर रोहित शर्मा आयसीसीच्या वनडे फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर पोहोचला. सिडनीत झालेल्या तिसऱ्या वनडेत त्याने आपल्या कारकिर्दीतील ३३वे एकदिवसीय आणि ५०वे आंतरराष्ट्रीय शतक झळकावले. त्याच्या त्या शतकाच्या जोरावर भारताने ऑस्ट्रेलियाचा ९ विकेट्सनी पराभव केला.

शुभमन गिल अन् विराट कोहलीची घसरण

अफगाणिस्तानचा इब्राहिम झद्रान दुसऱ्या स्थानी असून भारतीय कर्णधार शुभमन गिल पहिल्या स्थानावरून घसरून आता तिसऱ्या स्थानी पोहोचला आहे. दरम्यान, स्टार फलंदाज विराट कोहलीदेखील एका स्थानाने खाली येत पाचव्या क्रमांकावर पोहोचला आहे.

श्रेयस अय्यरलाही फायदा

दुसरीकडे, अलीकडेच ऑस्ट्रेलियाविरुद्ध उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या श्रेयस अय्यरने एक स्थानाची झेप घेतली असून तो आता नवव्या स्थानावर आला आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सिडनीतील तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतीय फलंदाज श्रेयस अय्यरला गंभीर दुखापत झाली आहे. झेल घेताना झालेल्या अपघातात अय्यरच्या बरगड्यांना मार लागला, ज्यामुळे अंतर्गत रक्तस्राव (घ्ह्रीहरत ताग्हु) सुरू झाला. तत्काळ त्याला रुग्णालयात नेण्यात आले असून, घ्ण्ळ मध्ये दाखल करण्यात आले. बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाने त्याच्या प्रकृतीवर लक्ष ठेवले असून, सध्या अय्यरची तब्येत स्थिर आहे, असे अधिकृत सूत्रांनी सांगितले.

# नीटनेटकेपणा असलेला संवेदनशील मनाचा प्रशासकीय वाटसरू म्हणजे डॉ.दिगंबर नेटके

## – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर
## – प्रशासकीय वाटसरू : डॉ.दिगंबर नेटके सन्मानग्रंथ प्रकाशन व गुरुगौरव शानदार सोहळा

**लातूर/प्रतिनिधी** :व्यक्तीचे कर्तृत्व,नेतृत्व व संवेदनशीलता ही कोणत्याही माणसाला यशाच्या सर्वोच्च शिखरावर घेऊन जाते ती किमया डॉ.दिगंबर नेटके यांच्या आदर्श व्यक्तिमत्त्वात आहे.विद्यार्थी,पालक व संपूर्ण प्रशासनाचे मन जिंकण्याची सचोटी असणारा,कमी बोलणे,पण जास्त काम करणारा मितभाषी,आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून अविरत कष्ट करणारा,प्रशासन स्तरावर सर्वांचे प्रश्न संयमाने सोडवणारा,परीक्षा सुरळीत पार पाडावी यासाठी विविध विद्यापीठ गाजविणारा आणि प्रशासनातील बारकावे,धागेदोरे माहीत असणारा,निस्वार्थी,निगर्वी आणि नीटनेटकेपणा असलेला संवेदनशील मनाचा प्रशासकीय वाटसरू म्हणजेच डॉ.दिगंबर नेटके असे त्यांचे प्रेरणादायी व्यक्तिमत्व आहे,असे प्रतिपादन सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर यांनी केले.

येथील प्रशासकीय वाटसरू-डॉ. दिगंबर नेटके सन्मानग्रंथ,संपादक मंडळ व नेटके परिवार,तपसे चिंचोली आणि नागरी सेवागौरव समिती,लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२८ ऑक्टोबर २०२५ रोजी दयानंद शिक्षण संस्थेचे सभागृह,लातूर येथे प्रशासकीय वाटसरू : डॉ.दिगंबर नेटके सन्मानग्रंथ प्रकाशन व गुरूगौरव सोहळा शानदार संपन्न झाला.यावेळी ते बोलत होते.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्वारातीम विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.मधुकर गायकवाड,कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे मा.कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व्यवस्थापन सदस्य डॉ.अशोक चव्हाण,सत्कारमूर्ती स्वारातीम विद्यापीठाचे मा.संचालक,परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे डॉ.दिगंबर नेटके,पत्नी सौ.रंजना नेटके,मातोश्री शेषाबाई मालोजी नेटके,ग्रंथ संपादक डॉ.संजय भालेराव,प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड,लोककला अकादमी मुंबई विद्यापीठाचे डॉ.गणेश चंदनशिवे,डॉ. नागोराव कुंभार, प्राचार्य डॉ.राजकुमार मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे असे म्हणाले की,डॉ.दिगंबर नेटके हे दुर्लक्षित समाजातून प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशस्वी झालेले उत्तम प्रशासकीय वाटसरू आहेत. त्यांच्या स्वभावात नीटनेटकेपणा,शिस्त, मितभाषीपणा,अहंकार नसलेला,नाजूक वाटा चोखपणा पार पाडणारा,सभ्य व निर्मळ मनाचा उत्तम प्रशासक,एक सच्चा मित्र,संघर्षशील,दूरदृष्टी असणारा कार्यक्षम अधिकारी,कर्तव्यनिष्ठ,प्रामाणिक संयमशील व्यक्तिमत्व आणि विद्यापीठ प्रशासनातील कार्यकुशल व्यक्तिमत्व आहे.परीक्षा,परीक्षेतील सुधारणा व मूल्यांकन यामधील सर्व प्रश्न संयमाने सोडवणारा,परीक्षेचा निकाल वेळेत लावण्यासाठी कठोर परिश्रम करणारा दिलदार मनाचा आदर्श माणूस आहे,असे त्यांनी सांगितले.

यावेळी सत्कारमूर्ती डॉ.दिगंबर नेटके मनोगत व्यक्त करताना असे म्हणाले की,दुर्लक्षित असलेल्या मातंग समाजात जन्माला आलो.पण आई-वडिलांचे कष्ट,त्यांची खंबीर साथ आणि गुरूंनी केलेले संस्कार व गावामुळे घडलो.मातंग समाज हा शिक्षणापासून खूप मागे आहे. सर्वांनी शिक्षण घेतले पाहिजे.शिक्षण घेतल्यामुळेच मला विविध विद्यापीठात अनेक संधी मिळाल्या,त्या संधीचे मी सोने केले.परीक्षा नियंत्रक म्हणून परीक्षा विभाग प्रामाणिकपणे कोणताही गैरप्रकार न होता व कोणताही कलंक लागू न देता यशस्वी कार्य केले.जात,धर्म,पंथ,गटतट असा कधीच भेदभाव केला नाही.सर्वांचे मन व विश्वास संपादन करून कार्य केले.म्हणूनच तुम्हीही संवेदनशीलता जपा आणि सर्वांच्या मदतीसाठी व सर्वांचे प्रश्न सोडवण्यासाठी पुढे या असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोप करताना माजी कुलगुरू डॉ.मधुकर गायकवाड यांनी डॉ. दिगंबर नेटके यांनी केलेली कार्यकर्तृत्वाची साधना,तपस्या,घेतलेली मेहनत,केलेले कष्ट,जपलेला माणुसकीचा निर्देशांक याप्रमाणे आयुष्यात कृतज्ञता,जीवनमूल्ये व दुसऱ्याला मदत करण्याची भावना ठेवा असे सांगितले.



सूत्रसंचालन डॉ.गणेश बेळंबे व डॉ.गोविंद काळे यांनी संयुक्तरित्या केले.प्रास्ताविक डॉ. नारायण कांबळे यांनी केले तर आभार रासेयो संचालक डॉ.मारुती गायकवाड यांनी मानले. स्वागतगीत डॉ.राम बोरगावकर व संच यांनी म्हटले.यावेळी प्रशासकीय वाटसरू : डॉ. दिगंबर नेटके सन्मान ग्रंथाचे प्रकाशन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.संपादक डॉ.संजय भालेराव यांनी ग्रंथाचे संपादकीय मनोगत व्यक्त केले.

या सम्मानग्रंथ प्रकाशन समारंभप्रसंगी गुरुगौरव सोहळ्याचेही आयोजन करण्यात आलेले होते.यावेळी डॉ.दिगंबर नेटके यांच्या मातोश्री तथा प्रथम गुरू शेषाबाई नेटके,तपसे चिंचोलीचे मा.प्राथमिक शिक्षक हनुमंत कदम,माधवराव सूर्यवंशी,जवळगाव पो.दे.चे माध्यमिक शिक्षक वसंत गाडीवाले,प्राचार्य गुरूलिंगअप्पा औटी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार तर कुलगुरू डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांना मरणोत्तर,माजी परीक्षा नियंत्रक स्वारातीम विद्यापीठ डॉ.शांतीनाथ बनसोडे,मा.संचालक डॉ.रमेश दापके,माजी प्राचार्य डॉ.आत्माराम पळणीटकर, प्राचार्य डॉ.विजय भोसले, व्यवस्थापन सदस्य डॉ.अशोक चव्हाण यांना प्रशासकीय वाटसुरू पुरस्कार देण्यात आल्या देण्यात आला.तसेच डॉ.राम बोरगावकर व डॉ.गणेश चंदनशिवे यांना कलाभूषण पुरस्कार, डॉ.एम.आर.पाटील, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, डॉ.दिवाकर कुलकर्णी, डॉ.संजय भालेराव,डॉ.भूषणकुमार मगरे, डॉ.देविदास वायदंडे,डॉ.नारायण राजूरवार यांना समाजभूषण पुरस्कार,ॲड.वसंतराव पाटील यांना कृषी मित्र पुरस्कार आणि डॉ.नागोराव कुंभार यांना साहित्यभूषण पुरस्कार प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.यावेळी डॉ.अशोक चव्हाण यांनी ग्रंथाविषयी भाष्य करताना व्यक्तित्व दर्पण,डॉ.गणेश चंदनशिवे यांनी साहित्य दर्पण, प्राचार्य डॉ.राजकुमार मस्के यांनी समाज दर्पण व डॉ.नागोराव कुंभार यांनी शिक्षण दर्पणावर प्रकाश टाकला. डॉ.जनार्दन वाघमारे यांनी ऑनलाईन मनोगतातून प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारा व संधीचे सोने करणारा विद्यार्थी होता.स्वत:च्या कर्तृत्वातून जीवन घडविलेले आहे.त्यांनी प्रामाणिकपणे काम करत भविष्य घडविले.परीक्षा नियंत्रक म्हणून फार मोलाचे योगदान दिले तसेच जीवनात त्यांनी मूल्यांची जोपासणा केली.या ग्रंथातील लेख अतिशय वाचनीय आहेत,अनेक विद्यापीठातील त्यांचे काम वाखाणण्याजोगी आहे,असे मत त्यांनी व्यक्त केले.डॉ.दिगंबर नेटके यांना दिल्या जाणाऱ्या मानपत्राचे वाचन डॉ.गणेश बेळंबे यांनी केले तर डॉ.गोविंद काळे यांनी कुलगुरू डॉ.उद्धव भोसले यांच्या संदेशाचे वाचन केले.कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी दयानंद शिक्षण संस्थेचे व महाविद्यालयाचे फार मोलाचे योगदान लाभले.याप्रसंगी डॉ.माधव गादेकर, डॉ.शिवाजी जवळगेकर,प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे,प्राचार्य डॉ.हरिदास फेरे,प्राचार्य डॉ.संजय वाघमारे,प्राचार्य डॉ.अपर्णा कोत्तापल्ले,नितीन कोत्तापल्ले यांच्यासह विद्यापीठ परिक्षेत्रातील नामवंत प्राचार्य,उपप्राचार्य,प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी,कर्मचारी, नेटके परिवार व तपसे चिंचोली गावातील ग्रामस्थ,साहित्यिक व इतर मान्यवर बहुसंख्येने उपस्थित होते.

# सहकार मंत्र्यांनी एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी दिले

**अहमदपूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे.यात आपला ही खारीचा वाटा या उदात्त हेतूने राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी त्यांचे मंत्री म्हणून असलेले एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधी साठी कपात करावे असे पत्र मंत्री ना. पाटील यांनी राज्याच्या अप्पर मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभागास दिले आहे.

सर्वसामान्यांचे झालेले हे नुकसान अतिशय वेदनादायी होते. राज्य सरकारने शक्य तितक्या तातडीने नुकसानग्रस्तांना मदतीचा हातही दिला होता. मी स्वतः शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे शेतकरी बांधवांच्या दुःखाची मला पूर्णपणे जाणीव आहे आणि म्हणूनच अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या बांधवांसाठी मदतीचा हात म्हणून माझे ऑक्टोबर महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा करण्याचा निर्णय घेतला आहे.

-ना. बाबासाहेब पाटील
सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य



## स्टॅच्यु ऑफ नॉलेजला प्रशासकीय मान्यता मिळाल्याने
# शहर जिल्हा भाजपाच्यावतीने आनंदोत्सव

**लातूर/प्रतिनिधी** : शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरात स्टॅच्यु ऑफ नॉलेज अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फुटी पुतळा उभारण्यात येत आहे. या कामाला प्रशासकीय मान्यता मिळून १० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याने लातूर शहर भाजपाच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. सदर प्रशासकीय मान्यता मिळाल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी विशेष आभार मानले आहेत.

तत्कालीन खा. सुधाकर शृंगारे यांच्या संकल्पेतून लातूर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरात स्टॅच्यु ऑफ नॉलेज अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फुटी पुतळा उभारण्यात येत आहे. सदर पुतळा उभारण्यासाठी तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष बाब म्हणून मंजुरी दिली होती. सदर पुतळा उभारला जाऊ नये याकरिता विरोधी पक्षांनी वेगवेगळ्या मार्गाने अडचणी निर्माण करून विरोध दर्शवलेला होता. मात्र हा पुतळा उभारला जावा या करिता शहर जिल्हा भाजपासह अनेक संघटनांनी व भाजपा लोकप्रतिनिधीनी पाठपुरावा केला होता. विशेषतः भाजपा शहर जिल्हा अध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी सदर पुतळा उभारण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळून तात्काळ निधी उपलब्ध व्हावा या करिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर या पाठपुराव्यास यश आले असून स्टॅच्यु ऑफ नॉलेजच्या उभारणीस प्रशासकीय मान्यता मिळून पहिल्या टप्प्यात १० कोटी रुपयांचा निधी मंजूर झालेला आहे.

स्टॅच्यु ऑफ नॉलेजला प्रशासकीय मान्यता मिळाल्याने शहर जिल्हा भाजपच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून फटाक्यांची आतिशबाजी करत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.



स्टॅच्यु ऑफ नॉलेज उभारणीस प्रशासकीय मान्यता मिळून निधी मंजूर झाला हा क्षण केवळ लातूरसाठीच नव्हे तर पुर्ण महाराष्ट्रसाठी आनंदाचा असल्याचे सांगून शहर जिल्हाअध्यक्ष अजित पाटील कव्हेकर म्हणाले कि या पुतळ्यामुळे शहराच्या सौंदर्यात भर तर पडणारच आहे पण त्याचबरोबर प्रत्येकाला राष्ट्रहिताची व सामाजिक ऐक्याची प्रेरणा सातत्याने मिळत राहणार आहे. सदर कामास प्रशासकीय मान्यता मिळाल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यासह माजी पालकमंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. अभिमन्यू पवार, आ. रमेश कराड यांचे आभार मानून स्टॅच्यु ऑफ नॉलेज उभारण्यासाठी पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांच ज्या ज्या संघटनांनी पाठपुरावा केला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. लवकरच पुतळा उभारणी कामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होईल असा विश्वास शहर जिल्हा अध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केला. याप्रसंगी माजी शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

हा आनंदोत्सव साजरा करताना शहर जिल्हा सरचिटणीस संजय गीर, निखील गायकवाड, प्रविण कस्तुरे, महिला मोर्चा अध्यक्षा शितल मालू युवा मोर्चा अध्यक्ष ओम धरणे, अनुसूचित मोर्चा अध्यक्ष पवन आल्टे, किसान मोर्चा अध्यक्ष तानाजी झुंजे, अल्पसंख्याक मोर्चा अध्यक्ष मुन्ना हाश्मी, मंडल अध्यक्ष सुरेश जाधव, निर्मला कांबळे, राहुल भुतडा, रोहित पाटील, गोपाळ वांगे, व्यंकटेश कुलकर्णी, श्रीकांत रांजणकर, उदय देशपांडे, मधुसदन पारीख, दत्ता चेवले, रविशंकर केंद्रे, बाबा गायकवाड, विनय जाकते, किशन बडगीरे, धनंजय हाके, राजू सोनवणे, किशोर काळे, अतिश कांबळे, शैलेश भडीकर, मोहसीन शेख, अमजद पठाण, शितल पाटील, रत्नमाला घोडके, अर्चना आल्टे, राहुल कांबळे, विजय अवचारे, किशोर शिंदे, सचिन कांबळे, सागर घोडके, रमण लातुरे, संतोष तिवारी, श्रीनिवास मेनकुदळे, शिवशंकर कावळे, आदीसह पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

# आदर्श मैत्री फाउंडेशनच्यावतीने शेतकऱ्यांस खते बियाणांचे वाटप

**लातूर/प्रतिनिधी** : नुकत्याच झालेल्या आसमानी संकटामुळे हतबल झालेल्या २५ शेतकऱ्यांना मदतीचा हात नव्हे तर कर्तव्य समजून त्यांना खत बी बियांचे वाटप आदर्श मैत्री फाउंडेशन च्या वतीने आज करण्यात आले सध्या निसर्ग शेतकऱ्यावर कोपलेला दिसत आहे, अशा परिस्थितीत शेतकरी हतबल होऊन टोकाचे पाऊल उचलत आहेत, अशा शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी, त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहण्यासाठी आम्ही आदर्श मैत्रीच्या वतीने मदत नव्हे तर कर्तव्य समजून त्यांना हरभरा व गहू बियाण्याचे बॅग व खत वाटप आज करत आहोत. याशिवाय भविष्यात तुमची मुले उच्च शिक्षण घेत असतील त्यांना काही अडचण असेल तर त्यासाठीही सर्वतोपरी मदत करणार असल्याचे मत फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष बिराजदार यांनी प्रस्ताविकात व्यक्त केले. हा उपक्रम संपूर्ण लातूर वाशियांच्या सहकार्यातून नेटिजन्स फाउंडेशन स्कूल विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जमवलेल्या मदत फेरीच्या निधीमधून त्याचबरोबर फाउंडेशनच्या सर्व संचालकाच्या सहकार्यातून होत असल्याचे मत प्रा. सुधाकर तोडकर यांनी यावेळी व्यक्त केले.

आदर्श मैत्री संस्था ही नेहमीच गोरगरीब वंचितांच्या पाठीशी उभे राहणारे संस्था आहे यामधील सर्व संचालक सामाजिक बांधिलकी जपणारे असून समाजातील तळागाळातील लोकांची नाळ जोडलेले आहेत त्यामुळे त्यांना समाजातील सर्वच प्रश्नांची जाणीव आहे आणि त्या जाणिवेतूनच समाज उपयोगी असे अनेक उपक्रम ते घेत असतात असे मत समाज कल्याणचे उपायुक्त अविनाश देवसटवार साहेब यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रसंगी नायब तहसीलदार गणेश सरोदे प्राचार्य निलेश राजमाने सोनू डगवले यांच्यासह उपस्थित आपत्तीग्रस्त शेतकरी व महिला शेतकरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# कार्तिकी एकादशी निमित्त, हुब्बळ्ळि आणि पंढरपूर दरम्यान विशेष अनारक्षित गाड्या चालवणार

**सोलापूर/प्रतिनिधी** : कार्तिकी एकादशी निमित्त प्रवासी भाविकांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी भारतीय रेल्वे हुब्बळ्ळि आणि पंढरपूर दरम्यान विशेष अनारक्षित गाड्या चालवणार आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

ट्रेन क्रमांक ०७३५१/०७३५२ एसएसएस हुब्बळ्ळि-पंढरपूर अनारक्षित एक्सप्रेस विशेष (४ फेऱ्या)

- ट्रेन क्रमांक ०७३५१ एसएसएस हुब्बळ्ळि येथून दिनांक २९ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ५:१० वाजता निघेल आणि त्याच दिवशी सायंकाळी ४:०० वाजता पंढरपूरला पोहोचेल. (२ फेऱ्या)
- ट्रेन क्रमांक ०७३५२ पंढरपूरहून दिनांक २९ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६:०० वाजता निघेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ०४:०० वाजता एसएसएस हुब्बळ्ळि येथे पोहोचेल. (२ फेऱ्या)

रचना: १ एसी II-टायर, २ एसी III-टायर, १२ स्लीपर क्लास, ५ जनरल सेकंड क्लास आणि २ सामानासह ब्रेक व्हॅन. (२२ कोच)

ट्रेन क्रमांक ०७३६७/०७३६८ एसएसएस हुब्बळ्ळि-पंढरपूर अनारक्षित विशेष (८ फेऱ्या)

- ट्रेन क्रमांक ०७३६७ हि गाडी दिनांक ३०, ३१ ऑक्टोबर आणि २, ३ नोव्हेंबर २०२५ रोजी एसएसएस हुब्बळ्ळि येथून पहाटे ०५:१० वाजता निघेल आणि त्याच दिवशी दुपारी ०४:०० वाजता पंढरपूर येथे पोहोचेल. (४ फेऱ्या)
- ट्रेन क्रमांक ०७३६८ हि गाडी दिनांक ३०, ३१ ऑक्टोबर आणि २, ३ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ०६:०० वाजता पंढरपूरहुन सुटेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ०४:०० वाजता एसएसएस हुब्बळ्ळि येथे पोहोचेल. (४ फेऱ्या)

रचना: १० स्लीपर क्लास/जनरल सेकंड क्लास आणि २ सामानासह ब्रेक व्हॅन. (१२ कोच).

(०७३५१/०७३५२ आणि ०७३६७/०७३६८) साठी थांबे: धारवाड, अलनावर, लोंडा, खानापूर, देसूर, बेलागावी, पाच्छापूर, गोकाक रोड, घाटप्रभा, चिकोडी रोड, रायबाग, चिंचली, कुडाची, उगर खुर्द, शेडबल, विजयनगर, मिरज, अरग, ढालगाव, जथ रोड, वासुद आणि सांगोला.

बुकिंग: अनारक्षित कोचसाठी बुकिंग स्टेशनवरील बुकिंग काउंटर आणि यूटीएस ॲपद्वारे देखील करता येते. प्रवाशांना गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकिटांसह प्रवास करण्याची विनंती करण्यात येत आहे.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

यात्रेकरूंना विनंती आहे की त्यांनी कृपया नोंद घ्यावी आणि सुविधेचा लाभ घ्यावा.



# प्रा.डॉ. सत्येंद्र राऊत यांना लोकसेवा गौरव पुरस्कार




अणदूर (विजय पिसे)– जवाहर महाविद्यालय येथील संस्कृत विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असलेले प्रा.डॉ. सत्येंद्र राऊत यांना मुंबई येथील लोक गौरव राष्ट्रीय एकात्मता परिषद आणि एम.व्ही.एस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ६ व्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रीय एकता सन्मान महासोहळ्यात नवी मुंबई वाशी येथे साहित्य मंदिरात मा. लेफ्टनंट कमांडर निलेश झोपे, मा. सुधाकर पाटील,मुंबई येथील सहाय्यक पोलीस आयुक्त . रामचंद्र नागरगोजे, मराठी व हिंदी सिने अभिनेत्री अदिती सारंगधर, केतकी गावडे, ऊर्मिला डांगे तसेच मंत्रालयातील सांस्कृतिक विभागाचे मा. संजीव कुमार, प्रेरणादायी व्याख्याते मा. सीमा वाघ आणि संस्थेच्या संयोजिका सौ. सलमा एन. खान यांच्या हस्ते शैक्षणिक व साहित्य क्षेत्रातील महाराष्ट्र लोकसेवा राज्यस्तरीय गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. प्रा. डॉ.सत्येंद्र राऊत यांचे शैक्षणिक, सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रातील मोठे योगदान पाहून हा पुरस्कार त्यांना देण्यात आला.

हा वैशिष्ट्यपूर्ण असलेला पुरस्कार मिळाल्याबद्दल जवाहर संस्थेचे सचिव मा.रामचंद्र दादा आलुरे, महाविद्यालय विकास समितीचे संचालक ॲड मा. लक्ष्मीकांत पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी,उपप्राचार्य डॉ.मल्लीनाथ लंगडे तसेच आदर्श पत्रकार विजय पिसे व सहशिक्षिका श्रीम. दीपमाला खडके, महादेव राऊत आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रा. राऊत यांचे अभिनंदन केले.

# चांदीचे पुरस्कार विकून ५ शेतकऱ्यांचे कर्ज भरणार

उमरगा(प्रतिनिधी)–राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन मूल्यावर आधारित स्वामीनाथन आयोग यांच्या शिफारशी नुसार हमीभाव द्यावेत. असे स्पष्ट करून गेल्या २५ वर्षांत मिळालेले चांदीचे पुरस्कार विकून पाच शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार असल्याचे शेतकरी नेते विनायकराव पाटील यांनी सांगितले.

अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतकऱ्यांना तत्काळ नुकसान भरपाई मिळावी. शेतकऱ्यांना कर्ज माफीऐवजी स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार उत्पादित खर्चावर अधारित शेतमालाला भाव देण्यात यावेत, अशी मागणी आदर्श महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहातील पत्रकार परिषदेचे सांगितले. या वेळी पाटील बोलत होते.

केंद्रातील काँग्रेस सरकार माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात शेतकरीकर्जमाफी करण्यात आली होती. वास्तविक या कर्जमाफीचा शेतकऱ्यांना तात्पुरता दिलासा दिला. सातत्याने निसर्गाची अवकृपा खते व बियाणांच्या वाढत्या किमतीमुळे शेती व्यावसाय अडचणीत आलेला आहे. शेतकऱ्यांच्या मालाचा योग्य मोबदला मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक कचाट्यात सापडला जात आहे. वाढती महागाई, नापिकी, शेतमालास कवडीमोल भाव या एकूणच विवंचनेमुळे दिवसेंदिवस शेतकरी आत्महत्येच्या प्रमाणात वाढ होत आहे. शेतकरी संघटनांनी व विरोधी पक्षानी कर्जमाफीऐवजी शेतमालाला भावांतर योजनेप्रमाणे भाव मिळावा, या मागणीचा आग्रह धरण्याची गरज आहे. दूध उत्पादकांना पशुखाद्यात आर्थिक सवलत मिळावी. खते-बियाणांच्या किमती कमी कराव्यात, पशुधन खरेदीसाठी अनुदान मिळावे, यासह विविध मागण्यांसाठी लढा सुरूच राहणार आहे, असे पाटील यांनी सांगितले.

## विनायकराव पाटील यांचे शेतकऱ्यांप्रती दातृत्व



अतिवृष्टी अन् पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शेतीपिके वाहून गेली. घराचेही नुकसान झाले. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अनेक शेतकऱ्यांच्या घरी दिवाळी झाली नाही अतिवृष्टीमुळे आर्थिक अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना यंदा दिवाळी साजरी करता आली नाही. बहुतांश गरीब शेतकऱ्यांची दिवाळी साजरी झाली नसल्याने गेल्या २५ वर्षांच्या कालावधीत मिळालेले चांदीचे पुरस्कार विकून पाच शेतकऱ्यांना अर्थसाह्य करण्याचा निर्धार विनायकराव पाटील यांनी केला आहे.

# श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये २००७ च्या दहावी बॅचचे स्नेहसंमेलन

## अठरा वर्षांनी पुन्हा गुरुजन- माजी विद्यार्थ्यांनी अनुभवला शाळेचा दिवस



धाराशिव (प्रतिनिधी)– येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलच्या २००७ मधील इयत्ता दहावी बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन व त्यांना अध्यापन करणार्या शिक्षकांचा मेळावा पार पडला. तब्बल अठरा वर्षानंतर या बॅचला शिकविणारे गुरूजन आणि अध्ययन करणार्या विद्यार्थ्यांच्या या हृदयस्पर्शी सोहळ्यात एकमेकांना पाहून सर्वांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.

गुरूजनांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून स्नेहसंमेलनाची सुरुवात झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांना घडविणार्या गुरूजनांचा विद्यार्थ्यांनी सत्कार करून आदरभाव प्रकट केला. माजी विद्यार्थ्यांच्या या बॅचला माजी उपमुख्याध्यापक सिध्देश्वर कोळी, सेवानिवृत्त शिक्षक नाना हाजगुडे, रघुनाथराव आदटराव, अण्णाराव सुरवसे तसेच नूतन प्राथमिक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक प्रमोद गोरे, सूर्यकांत पाटील यांनी मार्गदर्शन करून जीवनात आणखी यशस्वी होवून स्वतःचा आणि शाळेचा लौकिक घडवा अशा सदिच्छा दिल्या.

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव प्रेमाताई सुधीर पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांच्या यशस्वी वाटचालीबद्दल समाधान व्यक्त करून आपल्या सहकार्यातून शाळेचा आणखी विकास आम्हाला करता येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. स्नेहसंमेलनास पर्यवेक्षक सुनील कोरडे, नरेंद्र पाटील, विष्णू इंगळे, दत्तात्रय इनामदार, संतोष देशमुख, एस.के. आघाव, मनोज माने, नेताजी मुळे या शिक्षकांची प्रमुख उपस्थिती होती.

माजी विद्यार्थ्यांनी अगदी शाळेच्या घंटीपासून राष्ट्रगीत व अठरा वर्षापूर्वी ज्या वर्गात अध्ययनाचे धडे घेतले त्या वर्गात आपल्या अध्यापकांसोबत पूर्वीचे क्षण अनुभवले. प्रत्येकाने शाळेतील अनेक आठवणीना यावेळी उजाळा दिला. त्यानंतर अगदी नाश्यापासून संगीत, नृत्य व सहभोजनाचा आस्वाद आपल्या गुरूजनांसमवेत माजी विदयार्थ्यानी घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईश्वरी देशपांडे, शिवकुमार गिरी यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता सागर माळवदकर, अजित भोरे, अजिंक्य गुंजाळ, अजिंक्य काळे, दीपक आदटराव, अमितमुमार शिंदे, रविराज लगदिवे, गणेश घोडके, नीलेश गोरे व इतर माजी विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

# धाराशिव जिल्ह्यात नद्यांना महापूर, अनेक गावचा संपर्क तुटला

**धाराशिव (प्रतिनिधी)– धाराशिव जिल्ह्यात शुक्रवारी (दि.२६) रात्रीपासून पावसाचा वेग प्रचंड वाढला आहे. तो शनिवारी पहाटेपासून रात्री उशीरापर्यंत सुरु आहे. त्यामुळे जिल्ह्यातील बहुतांश प्रकल्प, नद्या, नाले, ओढे यांना महापूर आला आहे. तसेच या नदी नाले, ओढ्यावरील पुलावरुन पाणी ओसंडून वाहत असल्यामुळे जिल्ह्यातील अनेक ठिकाणच्या गावचे संपर्क तुटले आहेत. तर १ हजार लोकांना प्रशासनाकडून सुरक्षीत ठिकाणी हलविले आहे. पिकांच्या नुकसानीबरोबर घरांचे, शेतीची खरडून जावून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.**

धाराशिव जिल्ह्यातील सर्वाधिक एकमेव मोठा असलेला सिना कोळेगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात शुक्रवार व शनिवारी मोठ्या प्रमणात पाउस झाला आहे. त्यामुळे हा प्रकल्प तुडूंब भरला आहे. या धरणातून शनिवारी (दि.२७) सायंकाळी ५ वाजता ८० हजार १५० इतका विसर्ग करण्यात आला आहे. त्यामुळे सिना नदीच्या दोन्ही तिरावरील शेतकरी, नागरिक या सर्वांनी सतर्कतता बाळगण्याचा इशारा देण्यात आला आहे. याशिवाय जिल्ह्यातील तेरणा प्रकल्पासह विविध १७ मध्यम प्रकल्पातील बहुतांश प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात पाणीसाठा झाला असून अनेक तलाव भरुन ओसंडून वाहत आहे. तेरणा प्रकल्प भरल्यामुळे तेरणा नदीही ओसंडून वाहत आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी नदीवरील पुलावरुन पाणी वाहत आहे. पुलावरुन पाणी जात असल्याने अनेक ठिकाणी गावचा संपर्क तुटला असून १२७ लघु प्रकल्पातही मोठ्या प्रमाणात पाणीसाठा झाला आहे. यातील अनेक प्रकल्पातील पाणी ओसंडून वाहत असून त्या भागातील नदी, नाले, ओढे याठिकाणच्या पुलावरुन पाणी जावून गावचा संपर्क तुटला आहे.

तुळजापूर तालुक्यातील शहापूर गावचा संपर्क पुलावरील पाण्यामुळे तुटला होता. पाणी कमी झाल्यामुळे साधारणत: दोन ते तीन तासानंतर वाहतूक सुरळीत सुरू झाली. दैठणा गावात रात्रीचा पावसामुळे दोन जनावरे वाहून गेली असून एक जनावर वीज पडून मयत झालेले आहे. दोन दिवशी अतिवृष्टीचा इशारा असल्यामुळे सर्व गावक–यांनी सुरक्षित रहावे. कसलीही अडचण असल्यास तात्काळ प्रशानाशी संपर्क करावा अशा सूचना अपर जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिल्या.

पांढरेवाडी (ईट) ता. भूम येथे संगमेश्वर प्रकल्पाातील वाढत असलेला विसर्ग लक्षात घेता तसेच मांजरा नदीची पातळी वाढत असल्याने याठिकाणी नदी पात्रलगत वास्तव्यास असणा–या २० ते २५ कुटुंबांना सद्य स्थितीत असणारी धोक्याची शक्यता लक्षात घेता त्यांचे स्थलांतर करण्याची व्यवस्था प्रशासनामार्फता जिल्हा परिषद शाळा ईट येथे केली आहे.

प्रकल्पाशी संबंधित जलसंपदा विभागाचे अधिकारी यांचेशी चर्चा करून अधिक पाणी पातळी वाढल्यास तत्काळ माहिती देण्याची सूचना केलेली आहे. जेणेकरून पुढील आवश्यक त्या उपाय योजना करता येतील. प्रशासन गावातील ग्रामस्थ यांच्या संपर्कात असून योग्य पूरस्थितीच्या अनुषंगाने योग्य ती खबरदारी घेण्यात येत आहे.

धाराशिव तालुक्यातील बेंबळी–बोरखेडा रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला आहे. काजळा (ता.धाराशवि) येथील पुलावरुन पाणी जात असल्याने वाहतूक बंद झाली आहे. कळंब तालुक्यातील गोविंदपूर–खामसवाडी रस्ता बंद झालेला आहे. आढळा गावातील मांजरा नदीकिणारी धोकादायक नागरिकांना सुरक्षीत ठिकाणी हलविण्यात आले आहे. परंडा तालुक्यातील जवळपास एक हजार लोकांना सुरक्षीत ठिकाणी हलविण्यात आले आहे.


लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ १ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४

# स्क्रब टायफस आजाराबाबत सतर्क राहण्याचे आरोग्य विभागामार्फत आवाहन

धाराशिव (प्रतिनिधी)– राज्यात पुन्हा एकदा स्क्रब टायफस या संसर्गजन्य आजाराचा शिरकाव झाला असून यवतमाळ व छत्रपती संभाजी नगर या जिल्ह्यात स्क्रब टायफस आजाराचे रुग्ण आढळून आलेले आहेत . यामुळे सार्वजनिक आरोग्य विभागाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला असून या बाबत मा.सहसंचालक, हि.ह.व जलजन्य आजार , आरोग्य सेवा पुणे यांनी सर्व जिल्ह्यांना मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत यानुसार धाराशिव जिल्ह्यात आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहे.

स्क्रब टायफस हा एका विशिष्ट प्रकारच्या रिकेटशिया प्रकारच्या जीवाणूपासून पसरणारा आजार आहे. स्क्रब टायफस या जीवाणूचे नांव ओरिएंटा




टुसूगामुशी (Orienta Tutsuga-mushi) असे आहे. वेळेवर निदान आणि उपचार न झाल्यास हा आजार जीवघेणा ठरू शकतो.

**प्रमुख लक्षणे:**

तीव्र ताप आणि थंडी वाजणे
डोकेदुखी आणि अंगदुखी
अंगावर लालसर पुरळ उठणे
माइट चावलेल्या ठिकाणी काळा खपल्यांसारखा व्रण (Bea ) दिसणे
क धी क धी खोकला,उलट्या आणि श्वास घेण्यास त्रास होणे
गंभीर स्थितीत यकृत मूत्रपिंड आणि मेंदूवर परिणाम होणे

**प्रतिबंध व उपचार:–**

१) माइट नियंत्रणासाठी किटकनाशकाचा वापर करावा
२) झाडाझुडपात काम करताना पूर्ण बाहयांचे पायघोळ कपडे वापरणे
३) कपडे अंथरुण पांघरुणावर किटकनाशक औषधांचा वापर करणे
४) खुल्या जागी शौचाला जाणे टाळावे
५) झाडाझुडपात काम करुन आल्यावर कपडे गरम पाण्यात भिजवून धुवावेत.
६) स्क्रब टायफसचे रुग्ण आढळून आलेल्या रुग्णाच्या घराच्या भोवती असणा–या लहान मोठी खरटी झाडे झड़पे

**काढून टाकावीत**

७) चिगार अळी आढळून आलेल्या ठिकाणी जमीनीची नांगरणी तसेच जमीनीवरील सर्व पालापाचोळा जाळून टाकणेत यावा. पाळीव प्राणी व पोल्ट्री बर्डस् असलेल्या ठिकाणी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात याव्यात
८) स्वच्छता राखा– घराभोवतीची अनावश्यक झुडपे गवत आणि कचरा नियमितपणे साफ करा. परिसर स्वच्छ आणि कोरडा ठेवा.

आरोग्य विभागाने सर्व वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी व तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना सतर्क राहून आवश्यक प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेऊ नये.ताप डोकेदुखी किंवा अंगावर पुरळ यांसारखी लक्षणे आढळल्यास घाबरून न जाता त्वरित जवळच्या सरकारी आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा असे आवाहन डॉ.मैनांक घोष मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.धाराशिव व डॉ,एस.एल हरिदास जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी केले आहे.

**–डॉ.एस.एल.हरिदास**
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद धाराशिव

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649